म. ग्रं. स. ठाणे.
विषय
सं. क्र.

# माझा अमेरिकेचा प्रवास

REFBK-0020711

लेखक
. ल. तथा नाना जोशी
ए (व्यापार) टि म वि पुणे
आगपेटी तज्ञ

# माझा अमेरिकेचा प्रवास

( दिनाक १८ ऑगस्ट १९७३ ते १५ डिसेंबर १९७३ )

REFBK-0020711

लेखक :
ग. ल तथा नाना जोशी
बी.ए (व्यापार) टि म वि पुणे,
आगपेटी तज्ञ, ठाणे

किंमत ५ रुपये

प्रकाशकद्वय
प्राध्यापक प्रभाकर गणेश जोशी,
प्राध्यापिका सौ सविता प्रभाकर जोशी
समटर U. S A

●

लेखक
ग ल जोशी

●

छपाई
रामसिंह चुनावाले
'श्री' प्रेस चिखली, जि बुलडाणा (महाराष्ट्र)

●

सर्व हक्क प्रकाशकाचे व लेखकाचे स्वाधीन

●

किंमत ५ रुपये

## प्रकाशकांची प्रस्तावना

दिनाक १७ ऑगस्ट १९७३ ची गोष्ट श्रीरामप्रहरी शीतलशा वायुलहरींनी सुखावलेल्या अन् धरतीच्या हिंदोळचात गाढ झोपी गेलेल्या प्राणिमात्राना उषा आपल्या कोमल करकमलांनी उठविण्याचे दररोजचे काम करीत होती. तोंच टेलिफोनची घटा वाजू लागली. टेलिग्राफकपनी कडून (Westers Union) निरोप होता "माननीय ती नानासाहेब तथा ग ल. जोशी व ती. सौ सरस्वतीबाई तथा सासुबाई /आई भारतातून विमानाने आमचे भेटीस येण्या-करिता निघाले" घरांत सर्वत्र आनदी आनद झाला अशा मगल दिनाची प्रतीक्षा गेली काही वर्षे करीत होतो आमचा फार दिवसांचा मानस साकार होत होता.

त्या उभयतांना येथे येण्याचे आवाहन करतांना आमचे मनात बऱ्याच समिश्र भावना भ्रमण करीत होत्या ती नानासाहेब व ती सौ आईच्या भेटीकरतां तर आम्ही उत्सुक होतोच पण त्यापेक्षाहि उदात्त उद्देश म्हणजे ते आजपर्यंत ज्या स्वार्थत्यागानें व बाणेदारपणाने जे जीवन जगले त्याचे गौरवा-प्रित्यर्थ त्यांना "अमेरिका-प्रवास" ही एक प्रेमाची भेट द्यावयाची मनीषा होती ती आज साकार होत होती

ठाणेकरांना प्रामुख्याने, व इतर अनेकांना विदीतच आहे की, श्री. नाना-साहेबांनी आपले आयुष्य राष्ट्रसेवेमध्ये निर्लेपपणानें ओतले आहे. त्यांनी राजकीय सामाजिक आणि धार्मिक अशा अनेक क्षेत्रात प्रभावी कार्य केलेले आहे व ते आजही करीत आहेत त्यांच्या सहवासाच्या परिमळात आम्हाला अमेरिकेत चार महिने का होईना राहाता आले ह्यामुळे मनास सात्विक समाधान मिळाले

अमेरिकेंत पाऊल पडल्यापासून नेहमींची ती नानासाहेबाची चिकित्सक व जिज्ञासु प्रवृत्ती प्रकर्षानें कार्यान्वित झाली त्याचे अभ्यासपूर्ण निरीक्षण सतत चालू होते दररोज न चुकता भल्या पहाटे म्हणजे पांच वाजता उठून ते आपल्या अनुभूतींची नोंदणी करीत भारताला परतण्यापूर्वीच त्यांचे सात लेख ठाण्यात प्रसिद्ध झाले व नतर सात लेख परतल्यावर प्रसिद्ध झाले हे लेख आम्हाला, इतराप्रमाणेंच उद्‌बोधक व ज्ञानसपन्न वाटले म्हणून ती नानासाहेब / सौ आई याना त्या लेखमालिकाची एक पुस्तिका तयार करुन ठाणें-बाहेरील वाचकानाही लेखाचा फायदा उचलता यावा ह्या विचारानी हे प्रकाशनाचे काम आम्ही हाती घेतले ह्या पुस्तिकेच्या प्रारभी ती नानासाहेबानी केलेल्या सामाजिक कार्यांचा संक्षिप्तपणें गौरवपूर्ण उल्लेख करणें प्रस्तुतच होणार आहे.

'निष्ठा' स्वार्थत्याग व चिकाटी' ह्या त्रईवर ती नानासाहेबाचे जीवन अधिष्ठित आहे हिंदुस्थानला स्वातत्र्य मिळवून देणाऱ्या, गाधी युगातील पहिल्या प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या पिढीमधील ती नानासाहेब हे एक होत, राष्ट्राची हाक येतांच ती नानासाहेबानी मेडीकलच्या पैशाने श्रीमत घडविणाऱ्या उत्तम अभ्यासक्रमाचा, परकीय सरकारच्या कॉलेजात जावयाचे नाही म्हणून त्याग करुन व आपल्याला सर्व आयुष्य गरिबीतच घालवावयाचे अशी शपथ घेऊन स्वातत्र्य सग्रामात अहमहमिकेने उडी घेतली त्याना देशभक्तीमध्ये, द्रव्यार्जन करण्याकरता लागणारा वेळ, उरत नसल्याने आणि धदा सुरु केला तरीही पैसे मिळविण्यापेक्षा लोकाना मदतच करण्याकड लक्ष असल्याने, ती. नानासाहेबांना ( व त्याच्या कुटुबियानाही ) बऱ्याच वेळा सुख सोईंना मुकावे लागले परतु त्यामुळे नानासाहेबांनी ठरविल्याप्रमाणे त्याच्या जीवनात जी दुर्मिळ आढळणारी धार व नेक निर्माण झाली ती वाखाणण्यासारखी आहे

ती नानासाहेबाचे १९२४ ते १९३८ काळातील घाटकोपरच्या आगपेटीच्या कारखान्यातील मॅनेजर म्हणून नेतृत्व, समर्थ सेवक मडळ ठाणें, व समर्थ-को-ऑपरेटिव्ह कझ्युमर्स मेन्ट्रल स्टोअर्स, लिमिटेड, ठाणे, चे एक प्रमुख

संस्थापक म्हणून केलेले काम, व नंतर त्या संस्था चिरकाल टिकण्यासाठी वेळोवेळी दिलेले मार्गदर्शन, आणखी अनेक संस्था निस्वार्थ बुद्धीने चालविण्याचे दुर्दम्य कार्य हे सर्व आदर्शणीय होय अशा अनेक संस्थातर्फे झालेले कार्य व त्यातील त्याचा घबघवीत वाटा हे त्याच्या यशाचे प्रतिक होत

कोणतेही कार्य हातात घेतांना व ते कार्यान्वित करताना ती. नानासाहेबाचा जबर आत्मविश्वास व धैर्य कारणीभूत होतात जगद्गुरु स्वामी विवेकानदांनी म्हटलेच आहे की आत्मविश्वासानेच मानवाला दिव्यत्व प्राप्त होते ह्या गोष्टीचे सत्य ती. नानासाहेबाच्या कार्यातून व मनोभूमिकेतून सतत विदित होत असते

ती नानासाहेबानी कॉंग्रेसतर्फे तर अमोल जनसेवा केलीच परतु इतर राजकीय पक्षानी कोणतेही उपयुक्त कार्य हाती घ्यावयाचे म्हटल्यास ती नाना साहेबानी उदात्त अत करणाने सक्रीय भाग नेहमीच घेतला आहे अगदी अलिकडचे उदाहरण म्हणजे जनसघातर्फे झालेला कच्छचा सत्याग्रह मायभुमीचा एक तुकडा तोडून परदेशाकडे जात आहे हे समजताच पार्टीची वगैरे बधने तोडून त्यानी मोठ्या हिरिरीने सत्याग्रहात भाग घेतला ' राष्ट्रहित तेच माझे हित ' है त्याचे ब्रीद ती. नानासाहेबानी केलेले देशकार्य, व सामाजिक कार्य, विस्ताराने माडू म्हटल्यास दुसरे एक पुस्तकच तयार होईल

अमेरिकेंत असतांना आमच्या शेजाऱ्यालाच ती. नानासाहेबांनी आपलेसे केलेले नाही तर गावातील श्रेष्ठगणावरही छाप पाडली ती नानासाहेब व सौ. आई याच्यामुळे आमचा ह्या अमेरिकन गावात मान वृद्धिगत झाला आहे. गेल्या दहा वर्षात दिवाळी साजरी करु शकलो नाही ती गतवर्षी साजरी करता आली. व गेल्या दहा वर्षांचा वचपा त्यानी पूर्णपणे भरुन काढला. ह भ परायण ती. नानासाहेबाच्या कीर्तनाने मागल्यपूर्ण व आनदयुक्त गभीरतेचे वातावरण आमच्या येथे निर्माण झाले हे श्रोत्यापैकी हिंदु, मुसलमान, अमेरिकन कोणीही कधीही विसरु शकणार नाही प्रत्येकाच्या चिरकाल स्मरणांत राहील.


ती. नानासाहेबांनी ठाणें गांवची व भारताची सेवा करण्यांत आपल्या त्यागमय आयुष्याने, वेळेला स्वत खस्ता खाऊन, जनताजनार्दनाची आरती सतत केली त्याच्यासारखे निस्पृह, धाडसी व तत्वनिष्ठ भारतालाच काय पण जगालाहि सतत लाभणें आवश्यक आहे.

ती नानासाहेबांच्या पंचाहत्तराव्या वर्षी त्यानी सातसमुद्रापलिकडे, अमेरिकेत येऊन 'सन्मित्र' अंकातून प्रसिद्ध केलेल्या आपल्या लेखांतून निर्माण झालेले हे पुस्तक त्याना त्याच्या शहात्तराव्या वर्षी आम्ही अर्पण करीत आहोत.

ठाण्याचे श्री. स पां जोशी, मालक, समर्थ प्रेस, ह्यानी ती नानासाहेबांचे लेख प्रसिद्ध केले म्हणून ह्या गोष्टीस जोम मिळाला तसेच प्रामुख्यानें लिहावेसे वाटते कीं, आमचे मित्रवर्य श्री. रामसिंह चुनावाले, मालक, श्री प्रेस, चिखली ह्यानी हे पुस्तक श्रद्धाभावाने छापण्याचे आनदाने अंगावर घेतले. करिता इतक्या लवकर प्रकाशन शक्य झाले यासाठी त्याचे उभयतांचे आभार मानावे तेवढे थोडेच होत

समटर,
साऊथ–कॅरोलायना
अमेरिका
दीपावली १९७४

प्रभाकर गणेश जोशी
सौ सविता (विजया) प्रभाकर जोशी
कु चंद्रशेखर प्रभाकर जोशी



लेखक
( श्री. ग. ल जोशी )




सहधर्मचारिणी :
( सौ सरस्वतिबाई जोशी )



श्री नानासाहेब तथा सौ नानी

# मुबई विमानतळावर अमेरिकेस जातांना



आप्तेष्ठ व अनेक मित्रानी स्वागत केले.

# आशिर्वाद

अगदी लहानपणापासूनच तशीच काही चिन्हे दिसत होती व यामुळे आशा वाटत होती की तुम्ही चाकोरीच्या बाहेर पडून काहीतरी विशेष करुन दाखवाल, ही आशा सिद्ध तर झालीच पण पुढे पुढे तशीच ती वृद्धिगतही होत राहिली. आणि तीही अजून ! कसे ते पहा १९०८ साली लोकमान्य कैदेत गेले, विलायती साखरेत गाईचें रक्त घालतात व चहाच्या मळ्यांमध्ये मजुराना मारुन त्याचा भयंकर छळ करुन ते मेले की त्याचे देह खत म्हणून वापरतात तरी चहा व /वा साखर सोडावी म्हणून महान चळवळ झाली त्या वेळी तुम्ही साखर सोडली ती थेट १६ वर्षांनी स्वदेशी वतंकी साखर मिळू लागली तोवर आणि चहा तर कायमचाच अशा प्रकारे लहान वयांतच कणखरपणानें मन आवरलेत दीपावली-मध्ये, परदेशी ( चीनला ) पैसा जातो म्हणून दारू कामावर बहिष्कार टाकून सबध आळीमध्ये फटाके-बंदी करुन वरील प्रमाणेच मनावर तावा मिळविला व त्या वेळचे नगर सेठ कै त्रिभुवनदास गणावाला याच्याकडून टोपीच्या स्वरुपात पारितोषिकही पटकावलेत, बालवयातच (हरिभाऊ घाणेकर, वाघ मास्तर, अनंत घाणेकर, काशिनाथ ब्रम्हे, बाबू पुरोहित, दत्तु दामले, तुम्ही स्वत , बाळ आठवले, दत्तु घाणेकर या ) नवग्रहामध्ये समर्थ सेवक

मंडळ स्थापन करण्यात तुम्हीही एक होतात "कस्टम सारख्या अलोट पैसा मिळवून देणाऱ्या सरकारी नोकरीमुळे राजकारण करता येणार नाही म्हणून राजीनामा दिलात. भारतमातेच्या 'हांके' ला 'ओ' देऊन पाहिजे तेवढा पैसा मिळवून देणारा कॉलेजचा मेडिकलचा एक वर्षाचा अभ्यासक्रम पुरा झाला असतांही त्यावर बहिष्कार घालून स्वातंत्र्यासाठी पुढील जीवन गरिबीत जगावयाचे असा निर्धार करुन तशी शपथही घेतलीत तलावपाळीवर भाषण बंदीचा कायदा मोडून तुरुंगवासही पत्करलात ज्यानीमनी स्वप्नी नसलेले संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले अशा महापुण्य दिवशी दि १५-८-१९४७ रोजी येथील कलेक्टर कचेरीवर आपला तिरंगी राष्ट्रीय झेंडा फडकावण्याचा मान पटकावलांत पाच वर्षे सरकारशी सामना देऊन अखेरीस सेन्ट्रल रेल्वेला सर्व स्टेशनांचे प्लॅटफॉर्म वाढवावयास भाग पाडण्यात यश संपादिलेत कच्छ सत्याग्रहाला जाताना येथे गांधी उद्यानात सडेतोड भाषण केलेत व कच्छला पोलीस खाते व स्पेशल मॅजिस्ट्रेट यांना सळो की पळो करुन सोडलेत आणि युकॅरिस्ट कॉंग्रेस भरली तेव्हा शिवाजी मैदानावर समर्पक भाषण करुन अखेरीस सरकारचा गाव सोडून बाहेर न जाण्याचा हुकूम मोडून चौपाटीवर भाषण दिलेत

आणि आतातर या निराळ्याच पुस्तक प्रसिद्धीच्या क्षेत्रात पदार्पण करीत आहात

अशावेळी तुमच्या कार्यात तुम्हाला वरील प्रमाणे संपूर्ण यश येवो व सदरहू सारख्या आणखी कार्यासाठी तुम्हाला चिर आयुरारोग्य लाभो हीच ईशचरणी प्रार्थना करुन हा माझा तुम्हाला आशिर्वाद पुरा करतो

**विश्वनाथ लक्ष्मण जोशी**
श्री बंगला, प्लॉट नं. १०
विष्णुनगर, नौपाडा, ठाणे-२.

# अर्पण पत्रिका

ज्या माझ्या कर्तव्यनिष्ठ व अखड परोपकारी एकुलत्या एका थोरल्या बधूनीं, अखेरच्या क्षणी वडील कै लक्ष्मण पाडुरग म्हणजे आण्णासाहेब जोशी यांनी माझा हात त्यांच्या हातात घालून मला त्यांच्या स्वाधीन केले व स्वत पचतत्वी विलीन झाले तेंव्हापासून, माझे पुत्रवत् लालन-पालन-पोषण केले व मला धार्मिक-सामाजिक-राजकीय क्षेत्रामध्ये वागण्यास मनमुराद स्वातत्र्य दिले आणि मुळीसुद्धा क्रोध वा दु:ख न मानता उलट आनदच मानून उत्तेजनच दिले, त्या तीर्थस्वरुप विश्वनाथ लक्ष्मण म्हणजे दादासाहेब जोशी यांस ही पुस्तिका अर्पण केली असे.

— लेखक

* * *

# आत्मनिवेदन

मी मूळत आस्तिकच, नास्तिक तर नव्हे. परंतु-

आले देवाजीचे मना ।<br>
तेथे कोणाचे चालेना ॥

या उक्तीप्रमाणें त्यांनी माझ्या पूर्व आयुष्यात जी कांही माझी परीक्षा पाहिली आणि उत्तर आयुष्यांत त्याची पुरेपूर भरपाई करून दिली व देत आहे हे खरोखरी चमत्कारच होत यामुळे त्याच्यावरील माझी निष्ठा होतीच ती आणखी हजार पटींनी वाढली.

का ते पाहू या. मी भूमातेच्या 'हाके ला' 'ओ' देऊन तीला पारतन्त्र्यातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली तेव्हा आपल्या भावी जीवनामध्ये आपणाला गरिबीत दिवस कठावे लागतील हे पूर्णपणें लक्ष्यांत येऊन तशी शपथच घेतली । आणि कॉलेजच्या एक वर्ष पुरे झालेल्या मेडिकल कोर्सवर बहिष्कार टाकला नतर सभाबंदी-भाषण बंदी याचा कायदा भंग करून सत्याग्रही म्हणून तुरुगवासही पत्करला या व अशा कारणानी अखेरीस भयकर आर्थिक अडचणी आल्या असतांही निकटच्या आप्तेष्टांसुद्धा कोणाकडे हात पसरून याचना न करतां तसेच दिवस रेटले पण तत्त्वच्यूति होऊ दिली नाही या वेळी त्या प्रभूनींच कसेंतरी कां होईना पण मला सांभाळले वा माझे फुटून बुडणारे तारू वाचविले उलट अखेरीस त्याच प्रभूने मला अत्यंत अडचणीत असताना मनीऑर्डरने पैसे पुरविले परतु परगावाहून परत आल्यावर ती पाठविणाऱ्याचा भाडुपचा पत्ता पाहू जाता तो अद्याप मिळत नाही नतर एका उद्योगधंद्याच्या अखिल भारताच्या सर्व श्रेष्ठ हुद्यावर नेऊन बसविले व गॅझेटेड ऑफिसरचे अधिकारही प्राप्त करून दिले. आणि आता तर चिरंजीवानी परदेशगमन घडविले यामुळे माझ्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिति एकदम पुष्कळच सुधारली.

एवच ते दिवस आणि हे दिवस यामध्ये जमीन अस्मानाचा फरक पडला आहे हा एक मोठा चमत्कारच होय

शुद्ध चित्तानें शुद्ध व्यवहार केले व परमेश्वरावर श्रद्धा ठेवली तर परिणाम व फल न मागताही शुद्धच मिळाले पाहिजे परमेश्वर बरे वा वाईट फेडून टाकल्याशिवाय कधीही राहत नसतो आपल्यावरील बँक बॅलन्स् पूज्य करुन टाकीत असतो भले व बुरे त्याच व्यक्तीकडून फिटत नसते तो यासाठी वेगळ्या व्यक्तीची योजना करीत असतो पण फेडून टाकतो खास.

यास्तव या सर्व गोष्टीमुळे त्या जगन्नियंत्यावरील माझी निष्ठा सुरवातीला म्हटल्याप्रमाणें हजार पटींनी वाढली

अशा प्रभुचरणीं प्रथम प्रणाम करुन या हाती घेतलेल्या कार्यामध्ये मागील प्रमाणें यश लाभो हीच प्रार्थना

## व्यावहारिक

दि १६ जुलाई १९७३ चा सोमवार उजाडला एकाएकी अकल्पित ज्येष्ठ चिरंजीव भाऊ व ज्येष्ठ स्नुषा सौ. सविता याचे जोड सहीचे पत्र आले. "तिकिटे पाठविली आहेत आमच्या कॉलेजला सुटी आहे तोंच लवकरात लवकर निघून यावे" आश्चर्य वाटले आनंदही झाला पृथ्वीवरील उच्चतम देश पाहावयास मिळणार म्हणून एक गोष्ट मात्र मनाशी ठरवून टाकली की एवढी मोठी संधी परमेश्वर कृपेने व सविप्रभा यांच्या आदरयुक्त प्रेमाने मिळत आहे तिचा भरपूर फायदा घ्यावयाचा व याकरता मिळेल तेवढी माहिती प्रथम मिळवून निघावयाचे म्हणजे आपला देश व अमेरिका यांची तुलना करावयास सोपे जाईल व त्यांचे चांगले काय असेल ते घ्यावयाचे समजेल व आपणास त्यांना काय देता येईल तेही कळेल आज तरी अमेरिका हे राष्ट्र जगाच्या पाठीवरील सर्वश्रेष्ठ राष्ट्र समजले जाते सदरहू माहिती अमेरिकेत राहून आलेले माझे जामात चि. डॉ बाळासाहेब घैसास व ज्येष्ठ कन्यका चि सौ ताई व सध्या तिकडे असलेले द्वितीय चि - आप्पा द्वितीय स्नुषा चि. सौ गीता त्याचप्रमाणें इतर अवांतर ठिकाणाहून मिळविली. लहानसा पौत्र चि चांदोबा व द्वितीय कन्या चि. माई यांनी तर ती न मागवता पुरविली पहिल्याने तेथील कठीण शब्दांचे अर्थ तर दुसरीनें सभायज्ञ प्रश्नांची यादीच पाठविली

आम्ही अमेरिकेत पोहोचल्यावर काही दिवसानी नेहमी तेथील आपल्या लोकांशी सपर्क राखीत असलेले येथील श्री. वामन प्रभाकर ओक यानी मुद्दाम लिहीण्याची तसदी घेऊन पत्र लिहिले की, आपला पिंड लेखकाचा नसला तरी आपल्या पत्रातील लिहिण्याची हातोटी पाहिली की आपण जर आपल्या प्रवासाचे वर्णन बसल्या बसल्या लिहून काढलेत तर फार रोचक होईल व आपला येथील वेळ सत्कारणी लागेल व सर्वजण ते आवडीने वाचतील म्हणूनच त्याच्यामुळे मी उत्स्फूर्त होऊन कार्यान्वित झालो आणि माझ्या हातून काही तरी थोडे बहूत लिहिले गेले. करिता त्याचे आभार प्रथम मानले पाहिजेत

त्याचप्रमाणे येथे परतल्यावर ' चवदाही लेख वाचले आता ते पुस्तक रुपाने प्रसिद्ध करा '' असे प्रथम म्हणणारे माझ्या जेष्ठ चिरजीवाचे परमस्नेही-चि दत्तात्रय श्रीपाद म्हणजेच प्रभाकर बोरवणकर हे होत त्यानीही पुरस्कार केला म्हणून यांचेही आभार मानतो

याशिवाय माझ्या ओळखीचे वा अनोळखीचे अशा शेकडो सज्जनानी भेटले असता व घरीही येऊन माझे कौतुक केले फक्त एकच व्यक्ति अशी निघाली की त्यांनी माझ्या कांही मजकूराबद्दल नाक मुरडून माझी निंदा केली हेही नमूद करणे मी माझा क्रोध न मानता कर्तव्य समजतो

' व्यक्ति तितक्या प्रकृति ' या न्यायाने प्रत्येकाची पाहाण्याची दृष्टी वेगळी असणारच यामुळे मला जे तेथील आवडले ते पुष्कळांना आवडणारही नाही. उलट जे नावडले ते आवडेलही कदाचित या करता माझे विचार मी आपणा-पुढे मांडीत आहे हंसक्षीर न्यायाने जे आपल्यांना रुचेल व पचेल ते घ्यावे उलट जे आवडणार नाही ते सोडून द्यावे हे काम मी आपणावरच सोपवितो

मला जे कांही दररोज विशेष दिसले, मी वाचले, ऐकले व अनुभवले त्याची मी नोंद करुन ठेवीत असे व नतर मजकूर लिहून काढून पाठवीत असे. लोकसत्ता व केसरी याचेकडे मी प्रथम प्रसिद्धीचा प्रयत्न केला पण सपादकीय मडळात पूर्वी एकदा असलेले माझे नातेवाईक याचे पत्र आले की लोकसत्तेमध्ये सप चालू आहे व केसरीने कागदाच्या टचाईमुळे बाहेरील कोणाचाही व कसलाही मजकूर घ्यावयाचा नाही असे ठरविले आहे अखेरीस मजकूर ठाणे येथील 'सन्मित्र' कडे पाठविला व त्यानी तो वेळोवेळी छापलाही. करिता सपादक श्री. स पां जोशी याचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

वाचक वर्गाला एक नम्र विनती की, त्यांना मजकुरात ज्या कांही शका-कुशका वाटत असतील व कमी जास्त हवे असेल त्याविषयी मला कळविले तर ते पुढील आवृत्तीत घालता येईल तरी त्यांनी तेवढी तसदी घेतल्यास आभारीच होईन.

माझे चिरजीव व स्नुषा यांनी अमेरिकेचे निमत्रण देऊन व अवाढव्य खर्च करुन आम्हा उभयतांना अमेरिका पाहाण्याची सुवर्ण सधि दिली या बद्दल त्या उभयतांचे कौतुक करणें मी माझे कर्तव्यच समजतो त्याचप्रमाणें आता तर "हे लेख जरुर ते फेरफार करुन पुस्तकाच्या स्वरुपात प्रसिद्ध करावेत" असा लकडा त्या उभयतांनी एक सारखा माझ्यामागे लावला यामुळेच केवळ ही गोष्ट माझ्या हातून घडत आहे करिता पुन्हा एकदा त्यांचे कौतुक करुन पुरे करतो

कुमारी सुलभा नथूराम किरावत व कुमार श्याम मधुसूदन टिळक ह्यानी लिखाण करुन मला जे साह्य केले व 'श्री' प्रेसचे मालक श्री रामसिंह चुनावाले चिखली (जि बुलडाणा ) यांनी छपाईचे काम सुंदर व लवकर एवढेच नव्हे तर श्रद्धाभावाने करुन दिले याबद्दल त्याचे मनापासून आभार मानल्याशिवाय राहवत नाही.

शेवटी पुन्हा एकदा-

अनुभव येतो पण तो चिकाटीने व निष्ठेने घेणारासच कीं प्रभूच्या सत्तेवाचून काहीही घडत नाही अगदी झाडाचे पानही हालत नाही

म्हणुन प्रार्थना-

पडो पार हे कार्य माझ्या हातूनी ।<br>
विनती असे ही श्रीकृष्ण चरणी ॥<br>
आरभ करि आज कृष्णाष्टमीसी ।<br>
न झालें तरी लाज असो इति तयासी ॥


ठाणे, दि. ११-८-७४<br>
कृष्णाष्टमी

[signature]



**अमेरिकेत हौस्टन वेली येथील गव्हर्नर यांनी भेटीस बोलावून स्वागत केले**

मागे मा गव्हर्नर-समोर डावीकडून श्री ग ल जोशी, सौ सरस्वतिबाई जोशी, चि चद्रशेखर, सौ सविता जोशी व श्री प्र ग जोशी



व्हाईट हाऊस, वाशिंग्टन डी सी अमेरिकेचे प्रेसिडेंट राहतात त्या जागी **श्री ग ल. जोशी** तथा **सौ सरस्वतिबाई जोशी**

# १

## भारत ते अमेरिका चौदाहजार किलोमीटर दूर

सीतासशोधनाकरितां मारुती फार तर एक हजार मैल उड्डाण करुन गेला किंवा लक्ष्मण बेशुद्ध होऊन पडला तेव्हां सजीवनी मुळी आणण्याकरिता दोन हजार मैल गेला अथवा प्रत्यक्ष प्रभुरामचद्र परत फिरले तेव्हा त्यानी पुष्पक विमानाने तीन हजार मैलांची भरारी मारली असे मानलें तर आता मी त्याच्यापेक्षां जास्त म्हणजे १४००० मैल भरारीचे उड्डाण करीत आहे असे मनात येऊन क्षणभर मोठेपणाच्या स्वप्नांत रगून गेलो होतो पण दुसऱ्याच क्षणात शुद्धीवर आलो

### *विमानतळ*

आम्ही उभयता सान्ताक्रूझ विमानतळ (मुबई-भारत) ते केनडी विमानतळ (न्यूयॉर्क-अमेरिका) येथें व तेथून नतर पुढे चिरजीव याच्याकडे जाण्यासाठी येथील स्वातन्त्र्य दिन आटोपून तिसऱ्याच दिवशी म्हणजे दिनाक १८ ऑगस्ट १९७३ रोजी सायकाळी ५ वाजता घरांतून बाहेर पडलो. विमानतळावर

पोहोंचण्यास एक तास लागला पुष्कळच आप्तेष्ट मंडळी विमानतळावर येऊन दाखल झाली होती व आणखीही येत होती. खूप खटपट करुनही आम्हांला हवी होती तेव्हांची लवकरची एअर इंडियाची तिकिटे मिळाली नाहीत पुढ उशीराची मिळत होती आम्हाला चिरजीवाची सुट्टी संपत असल्याकारणानें लवकर जाणे जरुर होतें. पण नाईलाजाने अखेरीस एअर फ्रान्सची तिकिटें घ्यावी लागली आणखी कारणे अशी की एक तर आपल्याच देशी कंपनीला चार पैसे मिळावेत ही इच्छा व भाषेची अडचण येऊ नये व मेनच्या चवीमध्यें फरक पडू नये असें वाटत होतें पण यापेक्षा महत्वाचें कारण म्हणजे एअर इंडियाचे विमान सरळ थेट अमेरिकेला जाते मध्ये बदलावे लागत नाही इतर सर्व देशाची सर्व विमाने मध्यंतरी बदलावी लागतात

विमान तळावर पोहोंचल्यावर एअर फ्रान्स ह्या कंपनीची कचेरी शोधून काढली व मोठे सामान ताब्यात दिले. येथे सामान, त्याचें वजन व बरोबर घेतले असल्यास खाद्य पदार्थ त्याचे बाबतींत पुष्कळ त्रास देतात असे ऐकलें होते. परंतु तसे कांहीही झालें नाही येथे प्रत्येकी रु १५ चे आतर्देशीय पॅसेंजर सर्व्हिस फीचे तिकीट अमेरिकेच्या तिकिटावर चिकटविण्यात आले सामानाचा विमा मात्र घेत नाहीत फक्त माणसाचा घेतात सौ चा घेतला. माझा जास्त वयामळे घेतला नाही सौभाग्यवतीचे लाखास फक्त रु १० पडले मध्यंतरी पॅरिसला बदल असल्यामुळे त्या विमानाचे आणखी रु. १० म्हणजे एकूण रु २० भरावे लागले नंतर रुपये देऊन बदली डॉलर घेतले हे आता शंभरपर्यंत सहज मिळू लागले आहेत आम्हाला व्हिजिटर म्हणून प्रत्येकी ८ डॉलर मिळाले होते अर्थात विमानामध्ये पैसे मुळीच लागत नाहीत. कारण खाद्य पेये ठराविक वेळी विनामूल्य मिळतात, व ही भरपूर देतात.

## *मायभूमी अल्पकाळासाठी सोडताना*

वियोग अल्पकाळासाठी असला तरी विमानाचा प्रवास असल्यामुळें अतर्यामी मनामध्यें धागधूग दाटत असलेली चिन्हे सर्वांच्याच शद्बामध्ये व डोळ्यामध्ये

स्वच्छ दिसत होती आमच्या उभयतांच्या डोळ्यामध्ये मात्र तिकडील भेटीचा भावी आनंद व इकडील वियोगाचे वर्तमान दु:ख अशी आनंद व दु:ख मिश्रित आसवे तरळत होती. हारतुरे, फोटो, आप्तेष्टाशी हस्तांदोलने, नमस्कार व आशिर्वाद यांची देवघेव मोकळेपणे झाल्यावर शेवटी पुढे जाता जाता टाटा करीत करीत आम्ही कस्टम खात्यात प्रवेश केला

## *कस्टम खाते*

येथे गैरकायदा कांहीही सामानातून नेले जाऊ नये म्हणून तपासणी होते. अंगावरचे दागिने रु २००० किमती पर्यंत नेलेले चालतात. यापेक्षा जास्त असल्यास कस्टमचे डिक्लेरेशन सर्टिफिकेट घ्यावे लागते.

पॅसेंजर तपासणी यानंतर सीट नंबर मिळतात व शेवटी सिक्युरिटी ऑफीस-कडून खाजगी खोल्यातून अंगावरील सामानाची व खिशाची वगैरे झडती घेतली जाते गेल्या काही वर्षात खूप विमाने 'हायजॅक' झाली ( म्हणजे पायलटला बंदुकीची किंवा कमलीतरी दुसऱ्या हत्याराची दहशत दाखवून, विमान दुसरीकडे नेणे ) म्हणून अशी झडती हल्ली प्रत्येक पॅसेंजरची घेतली जाते एवढे झाल्यावर बाहेर एक बस उभी असते तीमधून विमानापर्यंत विनामुल्य पोहोचवले जाते विमानात चढण्याकरिता जिना उत्तम प्रकारचा असतो पायथ्याशी व वर हवाई सुंदऱ्या स्वागतासाठी तत्पर उभ्या असतात. शिडीच्या पायथ्याशी एका हवाई सुंदरीने स्मित हास्य करुन आमचे स्वागत व एका हवाई सुंदराने सरदारी थाटाने वाकून मान कलती करुन हात जिन्या-कडे दाखवून मार्गदर्शन केले जिना चढून गेल्यावर पुन्हा वर तिथे हाच थाट

## *विमानांतर्गत व्यवस्था*

एका हवाई सुंदरीने आम्हास आमच्या खुर्च्यांवर नेऊन बसविले व केव्हाही ओळख पटावी म्हणून आमचे सीट नंबरवर अडकवून ठेवले, आणि लगेच

एका चांदीच्या ट्रेमधून लेमन ड्रॉप्स पुढें केले. विमानात बसल्यावर काहींना मळमळते म्हणून ही सोय. एकेक खुर्ची म्हणजे टेबल, खुर्ची, शेल्फ व बेड अशा गोष्टींचा सुंदर मिलाफ असतो आपल्याच समोरील खुर्चीच्या मागच्या बाजूला कापडाचे दोन मोठे खिसे असतात, यामध्यें नकाशा, माहिती पत्रकें व ओकारी आल्यास एक चिकट कागदाची पिशवी आपल्यासाठीच ठेवलेली असते. ह्या खिशामध्ये आपले कागद पत्रही ठेवता येतात येथेंच रुंद अशी एक फळी साधलेली असते ही ओढली कीं झाले लिहिण्याकरिता व जेवणाकरता टेबल तयार खद्द खुर्ची बसावयास, हात ठेवण्यास व डोके टेकण्यास गाद्यांनी गुबगुबीत केलेली असते खुर्चीला एक कळ असते ती कळ दाबली की खुर्ची आडवी होते, एवढी की आराम खुर्चीप्रमाणे सहज झोप घेता येते येथील पट्टा कमरेला बांधला की विमान वर खाली होताना जागेवरुन पडण्याची भिती नसते प्रत्येकाच्या (डोक्या) वर कपाटे असतात यांच्यामध्यें आपल्याला थंडी वाटल्यास उबेसाठी मऊ, मऊ रग ठेवलेले असतात ते पुरविले जातात आपल्या हातातील हलके सामान आपल्या सीटच्या खालीच ठेवावयाचे असते तेथें जिरत नसल्यास हवाई सुंदरीला दिले की ती मुख्य दरवाजा जवळील कपाटात (क्लॉजेटमध्ये) नेऊन ठेवते सेल्फाच्या खालच्या भागाला म्हणजे आपल्याच डोक्यावर प्रत्येकाकरता स्वतंत्र दिवा व एअर होल असते दुसऱ्याला त्रास न होता हवा तर दिवा लावता येतो व हवी तर हवा खाता येते.

## हवाई सुंदऱ्या

ह्या स्मित हास्य करीत करीत मोठ्या चपळाईने इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरत फिरत कामें चोख बजावित असतात ह्यांचा घोळका पाहिला की जणु स्वर्गांतल पऱ्याच भूलोकावर अवतरल्या आहेत असा भास होई विमान वेळेवर बरोबर ९-१५ वाजतां सुटले आम्हाला जमेना म्हणून हवाई सुंदरीने खुर्ची आडवी करण्याचे दाखविले ११ वाजता आमचे शाकाहारी जवण आले जेवणामध्ये कीती पदार्थ होते ते मोजता मोजता मजा आली. दुधाची सुद्धा पॅकेटस् होती. डाळ-भात याची चव अत्यंत उत्कृष्ट होती.

हाताने जेवणे हे तिकडे नसतेच कागदाचे हातरुमाल पुरविलेले असतात यानीच हात व तोंड पुसतात फार थंडीमुळे पाणी वापरता येत नाही म्हणून कागदाचा वापर वाढला असावा रात्री झोप उत्तम लागली निद्रावस्थेत पांघरुण सरकले तर हवाई सुंदरी ममतेने सारखे करते हे मी प्रत्यक्ष पाहिले तरुण मुलाची पाघरुणे डोळे खोटे खोटे मिटून नक्कीच खाली पडत असतील

कोणीतरी हा कॅप्टन असावा माइकने गांव कुठले आले वगैरे सांगत मी माहिती मिळावी म्हणून प्रत्येक मुक्कामी उतरत असे. कराची, कुवेट वगैरे ठिकाणी उतरला स्टेशनकडे जाण्या येण्यास मोटार मिळे अगदी विनामूल्य याकरता पास घ्यावा लागे चुकामूक होऊ नये म्हणून काही खाणा-खुणा याची खूण ठेवून मी फिरत असे.

सकाळीं मात्र प्रातर्विधीसाठी विमानात धमाल उडाली मोठा थोरला क्यू लागला होता तरी घुसाघुशी मात्र नव्हती ३ संडास होते संडासामध्ये स्त्रीयाकरता – पुरुषाकरता असा भेद नव्हता मला ५ वाजता उठण्याची सवय तथापी मी ठरवून टाकले का पॅरिस ६ वाजता येत आहेच तेव्हा तेथेच प्रातर्विधी उरकावयाचा येथून पुढे, हिंदुस्थानात परतेपर्यंत पायखान्यात कागदच वापरायची तयारी ठेवावी लागले. कारण भारतासारखे येथे व पुढही पाणी वापरत नाहीत आम्ही मात्र तिकडच्या पद्धतीप्रमाणे कागद वापरून शिवाय आपल्या पद्धतीप्रमाणे पाणीही वापरीत होता याशिवाय आम्हाला चैनच पडेना कागद मात्र अत्यंत पातळ टिश्यू पेपर असतो हा फ्लश् मधून सहज जातो नाहीतर जाड असल्यास फ्लशमध्ये अडकून चेंदून राहावयाचा !

## पॅरिसवरून न्यूयार्क

पॅरिस, फ्रान्स, येथे पासपोर्ट, व्हिसा, वगैरेची तपासणी झाली हे काम करणारी एक स्त्री दक्षिण हिंदुस्तानी स्त्री असून मुंबईत वाढलेली होती नाव विचारले पण विसरलो हिच्यामुळे आमची पुष्कळ सोय झाली. येथे सौ ने प्रथम

एस्किलेटर (फिरता जीना) पाहिला मी जॉईन्ट डायरेक्टरचे काम करीत असतांना कलकत्त्याला रिझर्व्ह बँकेमध्ये पाहिला होता ४ तासानी विश्रांती घेऊन म्हणजे सकाळी १० वाजता दि १९ ऑगस्ट रोजी रविवारी पुन्हा दुसऱ्या विमानातून आमचा प्रवास सुरु झाला.

## विमानांतील आणखी सोयी

विमानात वर्तमानपत्रे विकत मिळत होती व भाड्याने इयर फोन लावून रेडिओ ऐकण्याची सोय होती मी सगळ्या गोष्टींचा अनुभव घेण्याचे ठरविले असले तरी वृत्तपत्रे फ्रेंच भाषेत व रेडिओवर फक्त इंग्लिश गाणी यामुळे दोन्हीची चव घेऊ शकलो नाही. परंतु एवढ्यात आमच्या सीटस्च्या समोरील पडद्यावर सिनेमा सुरु झाला आणि थोडीशी का होईना करमणूक वाटू लागली हल्ली ही नवीन सिनेमाची सोय निघाली आहे असे कळले परंतु ह्यात काय दिसू लागले तर एकसारखी चुंबने व अलिंगनें आणि हे तर मला मानवेना म्हणून सरळ, सरळ, झोप काढली झाले। हे पॅरिस ते न्यूयार्कचे 'हनुमान' उड्डाण एकसघ (नॉन् स्टॉप) असल्यामुळे शेवटी, शेवटी कटाळा येऊ लागला. कारण खाली पाणी व पुळण आणि लहान लहान झाडे झुडपे व डोंगर तर वर ढग-आकाश याशिवाय तिसरे काही दिसेना विमान जेव्हां ढगातून किंवा ढगावरून जाते तेव्हां देव व देवदूत असेच आकाशात चालत, ह्या गोष्टीची आठवण होते

## अमेरिकेत उतरलो

न्युयॉर्कला आमचे कनिष्ठ चिरंजीव श्रीकृष्ण किंवा आप्पा आलेले दूरवर दिसले आणि हायसे वाटले विमानातुन बाहेर पडतांना पायलट, हवाई सुंदऱ्या वगैरे मडळी 'फॉल इन्' करुन एका रांगेत किंचित नतमस्तक होऊन व स्मित हास्य करून मोठ्या प्रेमाने 'हाऽऽऽय्' म्हणजे (how are you now?) म्हणत म्हणत निरोप देत होत्या असे वाटत होते की त्यांचा व आमचा जणु काही कित्येक वर्षांचा जुना व जवळचा सबंध होता. येथे विशेष म्हणजे मुंबई वगैरे

ठिकाणच्या प्रमाणे उतरण्याकरता विमानाला शिडी लागली नाही तर विमानाच्या कुशीला असलेल्या दरवाज्याच्या उंची इतका उंच धक्काच बांधलेला आहे त्याला विमान लागले. त्यातून बाहेर आल्यावर उलट–सुलट जिने उतरून पुष्कळ चालल्यावर कस्टमच्या तडाख्यात आलो त्यानी पेटीमधून सामान काढण्यास धडाधड सुरुवात केली व 'हे काय, व ते काय' म्हणून विचारू लागले "मी मेटकूट, भाजणी, लोणचे" वगैरे म्हणून समजावण्याचा प्रयत्न केला आम्हाला त्याचे कळेना व त्यांना आमचे! कारण इंग्लिश तेच पण उच्चारात व बोलण्याच्या ढबीमध्यें खूप फरक आहे परंतु पुढे त्यानी आम्हांला लवकरच मोकळे केले

माता, पिता व पुत्र याची भेट झाली आणि सर्वांना अत्यंत आनंद झाला व्हिसा–पाकिट सम्भाळो–हुश्शियार अप्पासाहेबांनी सुचविले की येथे व राजधानी वाशिंग्टन, डी सी या ठिकाणी चोऱ्या होतात आणि त्याही एवढ्या जबरदस्त की लहान लहान मुलें सुद्धा हातातील सामान हिसका हिसकी करुन पळून जातात. मोठ्या चोरानी यांना तसे शिकवून तयारच केलेले असते कारण अज्ञान असल्यामुळे मुले शिक्षेस पात्र नसतात. तेव्हां चिरंजीवाचे म्हणणे सामान हातातच ठेवा व तेही घट्ट धरून! नाहींतर दुसरी चांगली सोय म्हणजे सामान लॉकरमध्ये ठेवता येते लॉकर म्हणजे भिंतीजवळ लहान, लहान, कपाटे उभी असतात त्यांत ठेवून किल्ली आपल्याजवळ ठेवावयाची चार्ज दिवसाला २५ सेंटस् (अंदाजे रुपये २) ही सोय उत्तम आहे

* * *

# २

## स्वत:च्या वास्तूवर

येथून आम्ही सोइस्कर म्हणून टॅक्सीने पेनसिल्व्हानिया ह्या रेल्वे स्टेशनवर गेलो येथे टॅक्सीला कॅब म्हणतात टॅक्सी ओळण्याची खूण म्हणजे कॅब (Cab) असा लहानसा बोर्ड आंत ड्रायव्हरच्या पुढे ठेवलेला असतो. आपल्या सारखी येथें पिवळा रंग वर व काळा खाली असलेली ती टॅक्सी अशी ओळखण्याची खूण नाही येथें मुक्कामावर पोहोचल्यानंतर हात पुढे करून बक्षीस मागण्याची रूढी आहेच न दिल्यास लगेच जबरदस्तीचा दडा व बॉक्सिंगला सुरवात. रेड कॅप (कुली) मिळेना म्हणू चिरंजीवांना कुली व्हावे लागले दोन गोष्टी सांगावयाच्या राहिल्या आम्ही तेहून उभे असता "हरेराम, हरेकृष्ण" ह्या येथे नव्याने सुरू झालेल्या पंथाची गोरीपान, नीटस देखणी अमेरिकन पण आपल्या पद्धतीचे नेसलेली नवयुवती चटकन पुढे होऊन तिच्या पंथा विषयी माहिती देऊ लागली दरम्यान एक मुसलमान मुल्ला–मौलवीमध्ये घुसून इस्लामी धर्माची माहिती देऊ लागला माझा संताप झाला म्हणून मी ताडकन् म्हटले She is speaking with me How do you interrupt? I do not want to listen to you You please go away ! ती बाई

माझ्याशी बोलत असतांना तुम्ही मधे का बोलता? मला तुमचे कांहीही ऐकावयाचे नाही तुम्ही चालू लागा एवढे जोरदारपणे म्हटल्यावर तो निघून गेला मग मी तिला म्हटले की मला "हरेराम, हरेकृष्ण' मध्ये रस आहे मी केव्हांतरी भेटेन

दुसरी गोष्ट शौचाला जाण्याविषयी येथे स्टेशनवर डझनभर संडास होते. परतु एकालाही आतून कडी नव्हती अखेरीस चिरजीवानी बाहेर पाहारा केला तेव्हा मला हा विधी उरकता आला

## बस सर्व्हिस

रेल्गाडी चुकली तेव्हा जवळच 'ग्रेहाऊड' व 'ट्रेजवेल' अशा दोन बस सर्व्हिसेस होत्या, पैकी दुसरीचा सप म्हणून पहिलीचे तिकीट काढले म्हटले अमेरिकन रेल्वेचा नाहीतर नाही पण बसचा तरी अनुभव घ्यावा पेटीचा विमा जरा जोराने बोलल्यावर घेतला गेला. विमा घेण्याचे टाळतात कारण मग पेटी पळविता येत नाही. बसमधील बसण्याच्या जागा अगदी विमानासारख्या वाटतात कडक्टर मात्र नसतो. ड्रायव्हरच कडक्टरची कामे करतो मध्यतरी रिचमड ह्या मोठ्या स्टेशनवर मशीनमध्ये नाणे टाकून आइस्क्रीम घेतले. प्रथम आइस्क्रीम मिळेना व नाणेही परत येईना 'स्वत च्या हक्काना जागा' हे आता-पर्यंत हिंदुस्थानात मी शिकवत आल्याने स्वस्थ बसवेना. मॅनेजराना भेटलो. तेव्हा मशीन उघडण्यात आले, पण काहीही जमेना अखेरीस आतून आणून द्या म्हटल्यावर तो देण्यात आली. आइस्क्रिम वा कोक (कोकाकोला) हा येथील बालापासून वृद्धापर्यंत सर्वांचा एकसारखा खाण्याचा छदाच म्हटल तरी चुकणार नाही काहीही काम करीत असताना एका हातात ह्यापैकी एक असलेच पाहिजे जणू काही सरकारने असा कायदाच केला आहे की काय असे वाटेल एखाद्याला.

आम्ही बसचे थेट समटरचे तिकीट काढले होते. परतु थोरले चिरजीव प्रभाकरराव उर्फ भाऊसाहेब यानी "फ्लॉरेन्सवर उतरा, मी गाडी घेऊन येतो"

असे मध्यंतरी "निघालो" म्हणून फोन केल्यावर सांगितले म्हणून फ्लॉरेन्स येथे आल्यावर आम्ही बस सोडून दिली तोच कन्यका मीना यांना घेऊन भाऊसाहेब आलेले दिसले सविता (सूनबाई) व नातू (चांदोबा) समटरला जेवण्याची तयारी करण्यासाठी थांबले होते ४० मैल मोटार हाकलल्यावर घरी आलो सूनबाईंनी सासूबाईंना 'आई' म्हणून व नातवानी आजोबांना 'आजोबा' म्हणून ज्या मिठ्या मारल्या त्या बराच वेळ सुटत ना! सर्वांना "आनंदी आनंद गडे। इकडे तिकडे चोहीकडे ।।" असे वाटले.

## कार-गाडी

भाऊची गाडी म्हणजे एक छोटेसे चालते धावते घरच होय कारण आता मागील बाजूला दोन माणसांना ऐसपैस निजण्याची सोय व याचे खाली खाण्या-पिण्याचे व फराळाचे सामान ठेवण्याची जागा आहे

घरी आल्यावर सूनबाईंनी आम्हांस पचारतीने ओवाळले व भाऊनी फोटो काढले स्वत:च्या मालकीच्या अमेरिकेतील वास्तूमध्ये पाय टाकला आणि स्वातंत्र्यासाठी मागील स्वीकृत अशा अधून, मधून भोगलेल्या निर्धनपणाची आठवण होऊन "तेव्हां व आता" अशी तुलना डोळ्यापुढे उभी राहिली व भडभडून आले आणि एवढ्यात आनंदाश्रूनी डोळे पाणावले. नऊ वर्षांपूर्वी भाऊसाहेब व सविता (मोठा मुलगा व सूनबाई) स्वत बरोबर फक्त सात, सात डॉलर्स (अदाजे रु. १००) घेऊन आले होते बाकी सर्व येथे स्वकष्टाने मिळवले बरेचसे हिंदवासीय असेच करतात 'कालाय तस्मै नम' व कर्मणो गहना गति ' यापैकी काय म्हणावे तेच समजेना!

। श्री ।

## चि व सौ *प्रभाकर* व *सविता* यांची
## सकष्टार्जित अमेरिकेतील वास्तु

खंड अमेरिका । तीमध्यें दक्खन कॅरोलायना नाम । काऊंटी वसे ।।
सदर कौन्टीत । समटर ज्या नाम ।। असे एक ग्राम । सुप्रसिद्ध ।।
ॲन्ड्रेना ड्राइव्ह । नावे यात पथ ।। सर्वही रस्त्यांत । असे स्वच्छ ।।
या सडकेवर । प्लॉट क्रम बारा ।। सविप्रभा थारा । मिळाला बा ।। १ ।।

भव्य ते अंगण । यांत टुमदार ।। बंगला सुंदर । ठाके पुढें ।। २ ।।

प्रवेशितां दिसे । लिव्हिंग् रूम आंत ।। काय नसे ह्यात । कोण सांगे ?
कोनात डोलत्या । फिरत्या खुर्च्या ।। कार्पेट गालिचा । मुलायम ।।
तबला, पेटी, फोन । टेप टी. व्ही जाण ।। आणि ग्रामोफोन नसे काय ?
आतल्या बाजूला । शय्यागृह असे ।। चांदोबाची दिसे खोली मग ।।
दुसऱ्या बाजूला । किचन्, डायनिंग्, घर ।। इस्तरीचे यंत्र । कामा येई ।।
वॉशिंग्-ड्राइंग् यंत्र । डिश् वॉशर, हीटर ।। एअर कंडीशनर । हवेसाठी ।।
खास आम्हासाठी ' काढली जी खोली ।। सेल्फ् कंटेंड केली । सविप्रभे ।।३।।

मागल्या बाजूला । थोर ते उद्यान ।। भाजीपाला छान । फळें फुले ।।
शेजारी गॅरेज । यात गाड्या दोन ।। दोघांना समान । जाण्या येण्या ।।
त्याच्यामध्यें एकी । झोपण्याची सोय ।। पुरी लाब होय । दोघासाठी ।।
परदेशी वास्तु । नसे गप्पा-सप्पा ।। जीवनात टप्पा मोठा असे ।। ४ ।।

– (नाना) गणेश लक्ष्मण जोशी
दि ४-९-७३

दुसऱ्या दिवशी शेजारीण व्हर्जीनीया (Virginia) आली ही खूप गप्पा मारीत बसली होती. अर्थात दोन बहिऱ्याच्या गप्पाप्रमाणे मी तिच्या प्रश्नांना काही तरी उत्तरें देत होतो व ती माझ्या अखेरीस सूनबाईना बोलावून शेजारी बसविले तेव्हां संवादामध्ये सुसूत्रता प्राप्त झाली आणि हशा पिकला कारण शद्बाच्या उच्चारातील ही पहिली ढब जवळून बोलणारी ही पहिली व्यक्ती करिता मी मुद्दाम ह्याचे बोलणे–चालणें–बसणे–उठणे वगैरेंचे निरीक्षण करीत होतो पन्नाशीच्या घरात आलेली बाई परतु सडपातळ, नीटस, चपळ व हसतमुख यामुळे आम्हांस ती सुदर तर वाटलीच परतु शिवाय पन्नास ऐवजी पचवीस वर्षांची वाटली ही अतिशयोक्ति नव्हे खोलीत आल्याबरोबर हातात हात घेऊन हस्तादोलन केव्हां केले ते मला कळलेच नाही बसण्याची विशेष अशी कीं स्वत च्या पायाला पाय व गुडघ्याला गुडघा जोडून व ताठ अशी ती बसली. आपल्या इकडल्या प्रमाणे पाय फाकून पोक काढून नव्हे दुसरी शेजारीन मेरी. ही आपल्या पतीराजाना घेऊन आली. येतांना हीने टोपले भरुन तिच्या बागेतील झाडावरच्या मीरच्या काढून आम्हाला भेट म्हणून दिल्या, व आपल्याकडे अधून मधून येत जा असे निमत्रण करून गेली.

* * *

# ३

## ग्रोसरी शॉप-वाण्याचें दुकान

तिसऱ्या दिवशी दि. २२ आगस्ट रोजी चिरंजीव ग्रोसरीमध्यें म्हणजे वाण्याच्या दुकानांत घेऊन गेले. आंत पाऊल टाकले आणि चकीतच झालो. आपण ठाणेकरानी एक कुठे समर्थ भांडार सुरू केले आणि धन्यता मानीत बसलो. परंतु उभयताची तुलना केलीच तर आपल्या सारखे अक्षरश: ५६ भांडार एकत्र केले तरीही येथील काकणभर मोठे ठरेल, भव्य जागा, स्वच्छता, टापटीपपणा, आकर्षकता याचा तर उच्चांकच म्हटला पाहिजे. बरें हे गाव तसे पाहिले तर जिल्ह्याचेही ठिकाण नाही वस्ती फक्त वीसहजार व तीही विरळ विरळ मला तर प्रेक्षणीय स्थळांच्या यादीमध्ये येथील ग्रोसरीचाही अंतर्भाव करीत जावा असे वाटले. दुकानात शिरताना दरवाजा आपोआप उघडतो तीच गोष्ट परतताना मला तर येथें 'खिळा उघड' 'खिळा मीट' ची आठवण आली एन्ट्रन्स, एक्झिट अशी दोन दारे असतात आत गेल्याबरोबर बाबा गाड्या सारख्या तारेच्या गाड्या एका कोपऱ्यात पोलीस परेडप्रमाणें 'फॉल इन' करून एका रांगेत उभ्या केलेल्या असतात त्यापैकी एक घेऊन खरेदीसाठी निघावयाचे. बरोबर मूल असल्यास ह्या गाडीचा एक भाग खास त्यांच्यासाठी

तयार केलेला असतो त्यात त्याला ठेवता येते गाडी लोटत, लोटत निरनिराळ्या खात्यात हिंडून हव्या त्या वस्तू उचलून आपल्या गाडीत घ्यावयाच्या अगदी 'पिन टू पिॲनो' प्रत्येक वस्तूवर, वस्तूचें वर्णन, गुणधर्म कोणत्या तारखे पावेतो वस्तू टिकेल ती तारीख, किंमत, वजन, कंपनीचे नांव, पत्ता, याची नोंद असते यामुळे कोणाला कोणाशी चकार शब्द उच्चारण्याची जरूरच नसते मजकूर वाचावा व वस्तू घ्यावी थेट पेटंट औषधे सुद्धा! सेल्समन् नसतो मुळी फक्त ताज्या भाज्या व फळफळावळे वजन करण्यासाठी माणूस असतो खरेदी झाली की 'चेक आऊट' कौंटरवर म्हणजे कॅशरकडे यावयाचे व आपल्या वस्तू पुढे पुढे फिरत-ढकलत असणाऱ्या फळीवर ठेवावयाचे म्हणजे त्या आपोआप कॅशरच्या हाताशी येतात तो किंवा ती कॉम्प्टामिटरवर एका मिनीटात ५० वस्तूचेही बिल तयार करते येथे पैसे देताना कॅश तर नव्हेच पण चेक देण्याचीही जरूर नसते क्रेडीट कार्ड दाखविले की झाले उधार मिळते महिन्याचे शेवटी बिल येते येथे ही कार्ड ज्याची जास्त त्याला मोठा समजतात कर्ज देण्याघेण्याला येथे फार महत्त्व आहे. आपल्याकडे आपण कर्ज देण्यास व घेण्यास भीत असतो येथे १०० डॉलर येणे असल्यास शेरा असतो किमान १० डॉलर द्यावे कारण ९० डॉलरवर व्याज सुरू होते. व्याज मिळवणे ह्या गोष्टीकडे इकडे लक्ष असते बरे रक्कम फारच वाढत गेली तर मात्र ३ वेळा नोटीस येते यापैकी तिसरीत पैसे न दिल्यास म्हटलेले असते की आता आपली केस लोन कलेक्शन कंपनीकडे सुपुर्द केली जाईल यानंतर कर्जदार बेग, बॉरो, ऑर स्टील करून पैसे आणुन देतोच. कारण त्याला माहित असते की एकदा का ह्या कंपनीकडे केस गेली की आपण मेलोच कारण सामदाम दंड भेद यापैकी पहिल्या व तिसऱ्या गोष्टींचा प्रयोग ही कंपनी करील ह्याची फी जबरदस्त असते. असो बील झाले की लगेच एक माणूस येतो व वस्तू कागदाच्याच पण मजबूत व मोठाल्या पिशवीमध्ये भरून बाहेर आणून आपल्या मोटारमध्ये ठेवतो एक अत्यंत महत्वाची गोष्ट येथे सेल्समन नसतातच मुळी. वर म्हटल्याप्रमाणे आपणच आपल्याला हव्या असणाऱ्या वस्तू पसंत करून घेऊन बाबागाडीमध्ये साठवावयाच्या असतात करिता मला शंका आली की एखाद्याने इकडे तिकडे बघून हळूच एखादी वस्तू आपल्या खिशात भरली तर

कसे काय? माझे नातू चांदोबा याने फिरत असलेल्या काही लोकाकडे व वर छताखाली कोपऱ्या कोपऱ्यातून ठेवलेल्या आरशाकडे बोट दाखवून म्हटले की आरशांतून दिसल्याकारणाने व फिरत असलेले लोक हे गिऱ्हाइके नसून भांडाराचे लोक आहेत हे लक्ष ठेवीत असल्याकारणाने चोरी करणारा चोर सहज पकडला जातोच जातो असे असतानाही आमच्या एकदा पहाण्यात आले की एका वृद्ध बाईने एक वांगे घेऊन आपल्या पर्समध्ये घातलेच व बिल न करता त्या म्हातारीने ते वांगे फुकटात पचविले.

* * *

# ४

# स्वावलंबी विद्यार्थी, पोस्ट ऑफीस आणि सामाजिक चालीरीति

## *स्वावलंबी विद्यार्थी*

डिपार्टमेंट स्टोअर्समध्येच नव्हे तर सर्व प्रकारच्या दुकानात व हॉटेलांत सलून-मध्ये सुद्धा काम करणारी बरीच माणसे शाळा व कॉलेज विद्यार्थी व विद्यार्थीनी असतात स्वावलबन हे येथील विशेष होय चमत्कारिक वाटेल पण येथे मेयरला विशेष मान असतो, एवढा की तो एखाद्याला तुरुंग ही दाखवू शकतो, असा एका लहान गावातील एक मेयर पेट्रोल पपावर पेट्रोल भरण्याचेही काम करीत होता अमेरिकेत अमक्या एखाद्या कामाची लाज हा विषयच कोणाच्याही डोक्यात येत नाही. लाज-भीड मुर्वत हा कसा प्राणी असतो हे ह्यांना कळतच नाही. सुदर सुदर तरणे ताठे जवान व युवती हॉटेलमध्येही काम करीत असतात काही ठिकाणी तर टॉपलेस वा बॉटमलेस् वा दोन्ही प्रकारच्या मुली काम करतात (टॉपलेस म्हणजे वक्षस्थळ वस्त्रविहीन व बॉटम्लेस म्हणजे कमरेखाली विवस्त्रपणा) याना पगार भरपूर तर मिळतोच व शिवाय वाटेल

तेवढी टिपही मिळते काहीही करावे आणि पैसे मिळवावे हे ह्याना माहित ! काम करणाऱ्या कोणालाहीं काम मिळत नाही असे नाही सर्वांना मिळते याचा अर्थ येथे गरीबी नाहीच असेही नाही ती आहेही परंतु ती विशेषत काळ्यामध्यें परंतु लोकांना डोल (गरीबीभत्ता) मिळतो येथील वैशिष्टच असे की कोणीही कुठेही कसलेही कधीही वा केव्हाही काम करो त्या व्यक्तिला सरकारकडून 'सोशल सिक्युरिटी कार्ड' मिळते व चौदा वर्षांनी पेन्शन चालू होते मग तो व्यक्ति कोठल्याही जातीची, धर्माची, राष्ट्राची व राजकीय पक्षाची, असो व कोठल्याही ठिकाणी जाऊन वास्तव्य करो, त्या व्यक्तिला पेन्शन (म्हणजे स्पेशल सिक्युरिटी चेक) दरमहा मिळणारच !

## पोस्ट ऑफीस

दिनांक २४ ऑगस्ट रोजी पोस्ट ऑफीस पाहिले येथें वजन करण्यासाठी तराजू ठेवलेली असते भाऊसाहेबांनी तिकीटे देणाऱ्या यंत्रामध्ये २५ सेंटचे नाणें टाकले, पण तिकीटे एक सेंटवाली तीनच मिळाली लगेच त्यांनी तक्रार लिहिली व रात्र असल्यामुळें पोस्ट ऑफीस बंद होते, करितां पुसतपास खिडकीच्या फटीतून आत तक्रार पत्र सारुन दिले. दुसऱ्या दिवशी गेल्याबरोबर हातात पैसे ! कनिष्ठ चिरंजीव आप्पासाहेब याना मी इकडे येण्याची सांताक्रूझ विमान तळावर केलेली तार उशीरा मिळाली म्हणून त्यानी विचारणी केली आणि तिसऱ्या दिवशी हातात रिफंड पडला हेलपाटे नाहीत की, खरेखोटे नाही. की मागे-सारणे नाही ! आणि आपल्याकडे ? विवाहेच्छू कन्यकांची टिपणे, उत्तराकरता जोड कार्डासह विवाहेच्छु मुलाकडे पाठविली व त्यापैकी काही चुकीच्या पत्त्यामुळे परत आली तर त्याच्या जोड कार्डावरील तिकीटाचा छाप पोस्टामध्ये (चुकीने ! ) स्टँप मारून कॅन्सल करण्यात येतात त्याबद्दल नवी कार्डे किंवा पैसे मिळविण्यासाठी मला एकदा ६ महिने पत्रव्यवहार करूनही भागले नाही म्हणून ऑफीसात जाऊन ऑफीसरला भेटून भाडावे लागले एकदा तर पाणी अथवा गोंद काहीही चिटकविण्यासाठी मिळाले नाही म्हणून हाका मारूनही असिस्टंट पोस्टमास्तर बधेनात, तेव्हा पोस्टमास्तराना भेटावे लागले तेव्हा कुठे गोंद मिळाला.

आम्ही तेथे असताना पोस्टाने एक नवीनच कल्पना काढली व ती लोकाना फारच आवडली ती अशी की कार्डे तिकीटे-पाकीटे कोणाला पाहिजे असतील तर ती पोस्ट ऑफीस घरी पाठवून देते या करता फार मामुली आकार घेते गरजूनी फक्त यादी पाठवावयाची. यामुळे वृद्ध व वेळ न मिळणाऱ्यांची फार मोठी सोय झाली आहे ही बाब येथेही अनुकरणीय आहे.

## खरे खोटे पणा

येथे कोणी खोटे करीत नाही अशी कल्पना धरून चालतात असे दिसते, आणि ही कल्पना बव्हशी खरी आहेही ! परंतु तंतोतंत शभर टक्के मात्र नव्हे ! लहान लहान चोऱ्या माऱ्या करीत नाहीत कुलुपे न लावता बाहेर निघून जाणारी माणसे मी पाहिली आमचेच मोठे चिरंजीव अशा तऱ्हेने दोन वर्षे Texas मध्ये राहिलेही. याचा अर्थ सगळे सावच आहेत असेही नव्हे पैसा, खाणेपिणे एवढे मुबलक आहे व नोकऱ्या वाटेल तेव्हा मिळतात म्हणून चोऱ्यांची प्रवृत्ती कमी तरीपण चोऱ्या जरूर होतात, पळवा पळवी होते, पण त्या मोठ-माठ्या रकमासाठी ! लाख लाख—कोटी कोटी डॉलरसाठी

## सामाजिक चालीरिती

डेटिंग तर विद्यार्थीदशेपासूनच चालू असते हे न केल्यास आईबाप तुम्ह्यातच कांहीतरी उणेपणा आहे असे म्हणून त्या दृष्टीने मुलाकडे पाहतात यामुळे शाळांना जोडूनच मॅटर्निटीची व्यवस्था असते असे विधान करून अमेरिकन प्रचारिका कुमारी कॅथराइन मेयो ह्या 'मदर इंडिया' लिहीणाऱ्या लेखिकेला 'फादर इंडिया' च्या सी एस् अय्यर या लेखकाने सडेतोड, समर्पक व सणसणीत उत्तर दिले आहे डेटिंगमुळे मात्र माझ्या समजुतीप्रमाणें व्यभिचारी वृत्ती कमी असावी तरीसुद्धा मुलींची पळवापळव व मुलांचे खून चालू असतात वर्षावर्षाला बलात्काराचे आकडे फुगत आहेत हे सर्व प्रकार मोठाल्या शहरातच घडतात न्युयार्क व वॉशिंग्टन अशा मोठ्या गावात या

गोष्टीचा उच्चांक आहे. इतर ठिकाणी प्रमाण फारच कमी आम्ही येथे आलो त्या दिवशी न्यूयार्कहून पेन्सिल्व्हॉनियाला टॅक्सीने (कॅबने) जात असता आमच्या मुलाने अप्पासाहेबानी एक मोठा थोरला चौक दाखविला, त्या चौका-मध्ये भर दिवसा ढवळ्या एका सुस्वरूप तरुणीला ५–७ दिवसापूर्वी ५–७ जणानी उचलून मोटारमध्ये घालून पळवून नेली आईबाप धाय मोकलून रडत आहेत परंतु दिवसावर दिवस व महिन्यावर महिने लोटले तरी अद्याप पत्ता नाही वरील कनक व कांता याच्यासाठी घडत आहे ते साधेसुधे नव्हे, तर पिस्तुल, नेम, आवाज आणि मुडदा की संपला विषय । दोन मिनिटात पोलीस येतो चवकशी सुरू होते तरीपण गर्दी नाही की घोळका नाही जो तो आपापल्या कामात दंग । "पोलीसाचे काम पोलीस करील, आपले काम आपण करू या " ही विचार सरणी येथे जोरदार आहे । कोणी कोणामध्ये पडावयाचे नाही की कोणी कोणाच्या कामात ढवळा ढवळ करावयाची नाही !

मागील दोन गोष्टी नतर तिसरी गोष्ट नव्याने शिकलो ती म्हणजे कोणीही भेटले की–मग ते कोणीही असो अगदी लहान मुलापासून ते वृद्धापर्यंत यात तरुण युवतीही आल्या–"हाय" (क्वचित् 'हा' किंवा 'हे') स्मित हास्य करून म्हणावयाचे ! शेकडो हजारो स्त्रीपुरुषानी मला 'हाय हाय' चे एवढे चटके दिले की आता मी कुत्र्या-मांजराला देखील पाहिले तरी 'हाय' मुखावाटे निघून जाते. याचा अर्थ 'ह', कसें काय आहे? 'ठीक आहे ना' असा आहे हा शब्द स्वागतासाठी वापरतात (Meaning How are you ? ') पद्धत मजूरात आहे

दि ८।१० रोजी शेजारचे लॅंडलॉर्ड व लॅंडलेडी यांचे अमेरिकन गोरे जोडपे ओळख करून घेण्यासाठी आले येताना त्यानी बागेतल्या टोपलीभर मिरच्या भेट म्हणून आणल्या तासभर गप्पा मारून जाताना 'आमच्या घरी या' म्हणून बोलावणें करण्यास विसरले नाहीत मेरी नको नको म्हणत असता पतिराजानें दूध फार आवडते म्हणून कित्येक दिवस त्रिकाळ लोटयावर लोटे दूध घेतले परिणाम असा झाला की अखेरस त्याला मुतखडा झाला डॉक्टरानी संशोधन करावे म्हणून हा मुद्दाम उल्लेख केला

* * *

# ५

## वाखाणण्यासारखे 'हायवेज'

दिनांक २५ ऑगस्ट १९७३ रोजी जिआर्जिआ संस्थानची राजधानी अटलांटा येथील 'सफारी' 'सायक्लोरामा' 'स्टोन माऊन्टन,' व 'सिक्स फ्लॅगज्' ही प्रेक्षणीय ठिकाणें पहाण्याचा बेत ठरविला

आदल्या रात्रीच उशा–गाद्या, मुव्ही–कॅमेरा, टेपरेकॉर्डर / बायनॉक्युलर भरपूर फराळाचे वगैरे मोठ्या गाडीमध्ये साठवून गाडी सज्ज करून ठेवली मजल फार दूरवरची ३०० मैलाची असल्यामुळे आम्ही भल्या पहाटे निघालो गाडी-मध्ये हीटर म्हणजे गरम हवा येण्याचे यंत्र असल्यामुळे थंडीचा त्रास मुळीच झाला नाही व रेडिओ असल्यामुळें करमणूक झाली एकीकडे फराळावर हात मारीत व काहीही नवीन दिसले की त्याची माहिती मिळवून तिची नोंद करीत करीत ७०–७५–८० मैल वेगाने पुढे सरकत होतो

वरील प्रेक्षणीय स्थळांचे वर्णन करण्यापूर्वी हाय वे (High way मोठा रस्ता) ला लागल्यानंतर कोणकोणती वैशिष्ठ्ये पाहिली त्याची प्रथम माहिती द्यावी

असा मोह होतो व तो आवरत नाही म्हणून तो विषय क्षणभर बाजूला सारुन ह्याच प्रथम हाताळीत आहे याला कारणही तसेच आहे. ते असे की असल्या गोष्टी आपल्याला आपल्या देशात का करता येऊ नयेत? त्या करता याव्यात म्हणून माहितीसाठी त्या क्रमाने पुढे देत आहे तरी यावर मध्य सरकार, राज्य सरकार, एन्जीनिअरिंग कपन्या व/वा एखादा सधन, हुशार व देशप्रेमी इजिनिअर विचार करील काय?

## *विशेष वाटणाऱ्या गोष्टी*

१) रस्ते सरळ, मोठे, रुद व धोपट आहेत यामुळे दूरवरचे स्वच्छ दिसते

२) बाधणी उत्कृष्ट आहे कारण माल मसाला उत्तमच वापरला जातो. यात लाडी लबाडी नसते. माल उत्तमपैकी वापरलेला

३) स्वच्छता कमालीची असते. चाटले तर जिभेला माती लागणार नाही. एवढेच नव्हे तर 'खाणे झाल्यावर कागद बाहेर टाकू नका, डॉलर २०० दड द्यावा लागल, म्हणजे रु १५०० येथील पोलीस खाते अत्यत चतुर, चाणाक्ष, चपळ व चौकस आहे पकडल्यास सुटका नाही की क्षमा नाही' असे भाऊसाहेब वारवार सागत होते. बोलता बोलता गाडीवर निळया रगाचा दिवा असलेली गाडी आलीच, आमचे काही चुकले की काय क्षणभर शका आली पण ती गाडी बाजूने निघून गेली बरे वाटले

४) रस्ते इतके रुद की एकाच वेळी चार चार गाडया उलट सुलट सहज जाऊ शकतात. एकूण ८ गाडयाना ८ ट्रॅक पाडलेल्या असतात मोठ्या गावात ह्यापेक्षाही जास्त असू शकतात प्रत्येक ट्रॅक मधील वेग ठरविलेला असतो तसे फलकच ठिकठिकाणी रस्ताभर लावलेले आहेत वेग किमान पेक्षा कमी केल्यास व कमाली पेक्षा जास्त चढवल्यास आलीच निळया दिव्यावाली मोटार आणि लगेच कार्ड म्हणून समजावे! पोलीस कोठून कसा येतो ते समजतच नाही!

५) तपास करता कळले व नतर पाहिले की रस्त्यावर कांही अतरावर तारा

बसविल्या आहेत त्याचे वरुन गाडी गेली की गाडीचा वेग पोलीसला कळतो व वेग कमी वा जास्त असल्यास पोलीस लगेच येतो व ड्रायव्हरला तसे कार्ड देतो, जमिनीखालून ताराचे जाळे पसरविले आहे काही काही महत्वाच्या ठिकाणी तर कारचा क्रमांक ही कळविण्याची व्यवस्था केली आहे ह्याला 'रडार सिस्टम' म्हणतात

६) रस्त्यावरील पांढऱ्या तुटक रेषा वा पट्टे एकाच दिशेकडे जाणाऱ्या ट्रॅकच्या विभागणीच्या रेषा होत पिवळ्या रेषांचे ३ प्रकार आहेत दोन्ही तुटक, एक व दुसरी सलग आणि दोन्ही सलग पहिली दाखविते की डावीकडून गाडी येईल तिकडे लक्ष द्या, दुसरा प्रकार सांगतो की सलग रेषावाल्याकडील मोटार क्रॉस करूच शकत नाही, आणि अखेरचा प्रकार सुचवितो की दोन्हीकडील मोटार क्रॉस करू शकत नाहीत कसे ते खाली दाखविले आहे

दोन्ही गाड्या पुढे काढता येतात

डाव्या बाजूची गाडी पुढे काढता येत नाही

दोन्ही गाड्या पुढे काढता येत नाही

७) हायवेला क्रॉसिंग्ज् नाहीत म्हटले तरी चालेल ज्या ठिकाणी ते अपरिहार्य असेल त्याठिकाणी पूल बांधलेले असून पुलाच्या अलिकडे दोन्ही बाजूला फाटे काढलेले असतात. व या फाट्याच्या रस्त्यावरुन पुलावर जाऊन नंतर हवे तिकडे गाडी वळवावी लागते पुलाखालून मोठ्या हायवेचा ट्रॅफिक न थांबता चालू राहतो. Stop and start चा वेळ व खर्च वाचतो एकदा तर भाऊंना गाडी उलट फिरवावयाची होती, तेव्हां त्या पुलाच्या अलिकडील फाट्यावरुन गाडी पुलावर न्यावी लागली व नंतर एक्झिट नसल्यामुळे ५ मैल लांब जाऊन नंतर गाडी फिरवून पुन्हा तेवढेच मागे यावे लागले असा एकूण १० मैलाचा वळसा पडला परंतु सुरक्षितता (Safety) किती ?

८) ज्या ठिकाणी क्रॉसिंग भागच असेल त्या ठिकाणी दिवे हिरवे व तांबडे दिवसाचे २४ तास चालू असतात व सुमारे २० सेकंदानी आपोआप बदलत असतात (एका बाईनें क्रॉस करता करता दिवा लाल झाला लगेच पोलीसाने

कार्ड दिले व कोर्टाने डॉलर २० (म्हणजे रु १५०) दंड केला

९) रस्त्यांना क्रमांक दिले आहेत व ह्याचे फलक ठिकठिकाणी लावले आहेत रस्त्याचा नकाशा ड्रायव्हरने आपल्या जवळ ठेवावा व हवा तो क्रमांक व कमी-जास्त वेग याचे फलक बघत बघत इच्छित स्थळी जावे कोणी कोणाला विचारत नाही व कोणी कोणाला सांगण्याची जरुरी नाही

१०) हजारो मैल हिंडलो पण रस्त्याबर एकही प्राणी दिसला नाही. मग ते जनावर असो की माणूस असो कुत्रा मोकळा आढळला की डॉलर्स १०० (रुपये ८००) दंड आणि गाडीशिवाय माणूसच नाही एखादा काळा दिसतो पण तो क्वचितच।

प्रवाशाच्या सोईसाठी १०–२० मैलाच्या अंतराबर रस्त्याच्या कडेला एक मोठे टेबल व दोन्ही बाजूला दोन बाके ठेवलेली असतात याला "रोड साईड टेबल" म्हणतात येथे प्रवाश्यानी फराळ करावा परंतु कचरा जवळ ठेवलेल्या पिपातच टाकला पाहिजे नाहीतर लगेच पोलीस व तिकीट काही मोठ्या रस्त्याच्या बाजूला rest areas आराम करण्याच्या जागा सुशोभित करून राखून ठेवलेल्या असतात तसे उत्तम लॉन, गार पाणी, rest rooms' (लघवीची सोय), नकाशे वगैरे असतात आणि हेही सर्व विनामूल्य

* * *

# ६

## अजब 'सफारी' 'सायक्लोरॅमा' आणि अमेरिकन 'फ्री वेज्'

### सर्वस्वी मोकळ्या श्वापदांची भेट

आता घटकाभर बाजूला सारलेल्या विषयाकडे वळू या मजल दर मजल करीत करीत "सफारी" ला येऊन पोहोचलो येथे भला मोठा पशु संग्रहालय आहे. येथील फक्त वैशिष्ठ्य तेवढे सांगतो

तिकीटे काढली तेव्हा तिकीटाबरोबर आम्हांला विनामुल्य टेप रेकॉर्डही देण्यात आला हा एकसारखा बोलत राहतो 'गाडीच्या खिडक्या बंद करा, भिऊ नका, सिंह जवळ आला तरी तो काहीही करू शकत नाही परंतु काचांना फट मात्र ठेऊ नका म्हणजे झाले वगैरे तसेंच, प्रत्येक भागातून मोटार पुढे जाऊ लागली की रेकॉर्डवर पुढच्या श्वापदांचे वर्णन ऐकू येते मोटारचा स्पीड तासी ५ मैल फक्त ठेवावा लागतो आमच्या पुढे व मागे पुष्कळ गाड्या सहकुटुंब मुला-बाळांसह आमच्याप्रमाणेंच आल्या होत्या. येथें विशेष असें की सिंह पुष्कळच

पहावयास मिळाले. पाच पांच, दहा दहा अशा गटागटानी ते विखुरलेले बसले होते काही स्वेच्छाचारी एकेकटे सकाळीच सहल करीत होते आम्ही त्यांना चिडविण्याचा खूप प्रयत्न केला अगदी आमच्या गाडीपाशी यावे म्हणून दोन-चार वेळा तर गाडी अगावरही घातली कारण ते रस्त्याच्या कडेलाच अगदी ३–४ हातावरच बसलेले, उभे वा फिरत होते दोघातिघानी तर काचेवर पजेही मारले. त्याना वाटले असावे की आम्ही वनराज आहोत, आमच्यापुढे दुर्बल मानवाची मिजास ती काय? ह्यातील काहीजण स्थितप्रज्ञ झाले असावेत! एक तर दररोज येणाऱ्या मोटारी पाहून ते रूळले असावेत किंवा दिवसाच्या प्रकाशामुळे त्याचे डोळे दिपले असावेत आम्ही सर्वांनी ते मोजले तेव्हां १००–१२५ भरले अशीच आणखी सर्वप्रकारची श्वापदे मोकळी सोडलेली फिरत होती परततांना अर्थात टेपरेकॉर्डर परत घेतला.

## *सिव्हिल वारचा 'सायक्लोरॅमा'*

नंतर 'सायक्लोरॅमा' पाहावयास गेलो सायक्लोरॅमा याचा अर्थच मुळी एखाद्या विशेष प्रसगाचे-बहुश लढाईचे (प्रत्यक्ष) प्रात्यक्षिक डोळ्यासमोर जसेंच्या तसें दिसावे म्हणून तयार केलेले (सचित्र) चित्रण असा आहे तेव्हा हा शब्द वाचल्याबरोबर आम्ही काय पाहिले याची कल्पना वाचकाला येईलच. कित्येक एकर जागा घेऊन त्यावर हे उभारलेले आहे विजापूरच्या गोलघुमटासारख्या मोठ्या थोरल्या हॉलमध्ये आत हे बसवले आहे एकीकडे लाऊड स्पीकरवर माहिती देणे चालू असते. प्रत्यक्ष लढाईच आम्ही पहात आहोत असे वाटले गोळीबाराचा आवाज झाला त्यावेळी मात्र अगाला घाम फुटतो तोफ उडाली तेव्हा तर आम्ही दूर दूर होतो ते एकत्र झालो असे वाटून की मरावयाचेच झाले तर एकत्र तरी मरू! लहान मुले तर रडूच लागली प्रकाशाच्या झोतात रेल्वे उध्वस्त झालेली आहे, कुठे गोळीबार होत आहे, कुठे रक्तबबाळ होऊन सोल्जर पडत आहे, काही ठिकाणी मुडद्याचा खच पडला आहे, रक्ताचे पाट वाहात आहेत, मासाचा चिखल झाला आहे वगैरे पाहावयास मिळते हे अमेरिकेतील फार मोठे व भयकर यादवी युद्ध होते दि १२ एप्रील १८६१

रोजी सुरू झाली व दि ९ एप्रील १८६५ रोजी संपले हा लढा अमेरिकेतील उत्तरेकडील संस्थाने व दक्षिणेकडील संस्थाने यांच्या मधील होता ह्याचेच नाव यादवी युद्ध (सिव्हिल वॉर) ह्याचे एक प्रमुख कारण गुलामी नष्ट करण्यासंबंधी दुमत हे होते उत्तरेकडील संस्थाने व मध्य सरकार ती नष्ट करण्याच्या बाजूचे होते. तर दक्षिणेकडील संस्थाने ती नष्ट होता कामा नये व होत असल्यास आम्हास स्वतंत्र व्हावयाचे आहे म्हणून ह्यांनी प्रथम युद्धाचा झेंडा उभारला. अखेरीस समेट झाला आणि गुलामी नष्ट होण्याचा कायदा झाला. पण अमेरिकेचे अध्यक्ष अॅब्रॅहॅम लिंकन यांना प्राणास मुकावे लागले. आणि तेही चवथ्याच दिवशी नाटक पहात असता त्याच्यावर गोळी झाडण्यात आली यामध्ये ह्याची धर्मपत्नि सामील होती आणि विशेष म्हणजे असें की खुनी माणसाचा पत्ताही लागला नाही व अॅब्रॅहॅम लिंकनच्या पत्निला गुन्हेगार न ठरविता ' तिचे डोके फिरले आहे ' असे ठरवून सोडून देण्यांत आले. याचा अर्थच असा की तो एक मोठा योरला कट होता वाईटांतून चांगले असे की गुलामी नष्ट करण्याचा कायदा मात्र झाला खरी गुलामी पुरेपुर गेली की नाही हे ठरविण्यासाठी गेल्या सव्वाशे वर्षांचा इतिहास व चालीरोतीचा अभ्यास करावा लागेल !

## स्टोन माऊंटन्

नंतर आम्ही "स्टोन माऊंटन्" पाहिला हा समुद्र सपाटीपासून १८६३ फूट उंच आहे. तज्ञाचे मत आहे की हा एकुलता एक किंवा एकमेव खडक असून याने खालील न दिसणारी जमीन १०० चौरस मैल व्यापली आहे व दिसणारी जमीन २,५०००,०००० चौरस फूट असून यावर एक उद्यान तयार केले आहे हे ४००० चौरस एकर आहे म्हणून हा जगामधील ८ वा चमत्कार मानतात वर जाण्याकरता केबलकारने जावे लागते याला "आकाश-पाळणा" म्हटले तरी चालेल यात ५० माणसे बसू शकतात. काटकोनाने अंतर ७३० फूट असले तरी उतार २३५० फूट आहे पाळणा एका सेकंदाला २३ फूट कापतो जिग् बॅक् सिस्टिमने स्वीस कंपनीने हा पाळणा तयार केला असून सर्व व्यवस्था

होच कंपनी पाहाते सदरहू डोंगदर्शनाच्या भागावर 'दक्षिण अमेरिका स्वतंत्र आहे' असे म्हणून बंडाचा झेंडा उभारणाऱ्या दक्षिण भागाच्या कॉन्फिडरेटचे म्हणजे ७–८ प्रांताचा ग्रुप अध्यक्ष जेफर्सन डेव्हिड, जनरल रॉबर्टली आणि स्टोन वॉल जॅक्सन याचे घोड्यावर स्वार असलेले पुतळे कोरून काढले आहेत दक्षिण प्रांतात भिती वाटत होती की उत्तरेकडे इनके इंडस्ट्रीकलायझेशन होते आहे की, तेच सर्व हक्क स्वाधीन घेतील येथील व सभोवतालचे सृष्टीसौंदर्य अवर्णनीय आहे

## मोटेल

रात्र पडली आणि आम्ही स्टॉकब्रिजमधील 'मातादोर मोटर इन' नांवाच्या मोटेलमध्ये जाऊन मुक्काम ठोकला मोटेल म्हणजे लॉज सारखे राहाण्याचे स्थान अत्यंत उत्कृष्ट राजशाही थाट! येथे काय नव्हते? सर्व काही होते खुर्च्या, टेबले, छप्परपलंग, टेलिफोन, रेडिओ, सगळे काही झकपक! आणि बाहेर पोहण्यासाठी बांधून तयार केलेला सुंदरसा तलाव. पण आकार काय म्हणाल तर दोन माणसांच्या एका खोलीचे भाडे डॉलर १५ म्हणजे सुमारे रु ११५ फक्त!

## 'सिक्स फ्लॅग्ज्' अटलांटा

सकाळी उठून उपहार करून "सिक्स फ्लॅग्ज्" पाहिले याठिकाणी खूपच मजा आली. कारण येथें पुष्कळ प्रकारचे राइड्स होते. म्हातारे कोतारेही राईड घेत होते म्हणून मीही घेतले हे एक नुसते मजा करण्याचे केंद्र आहे जत्राच म्हणा ना! रोज सकाळी १० ते रात्री १२ पर्यंत खुले असते अशी सोय प्रत्येक प्रांतात एके ठिकाणी तरी असते. दिवसभर वेळ सहज घालवता येईल एक विशेष कार्यक्रम म्हणजे १८ व्या शतकातील 'गन् फाईट'

## भाऊसाहेब व ड्रायव्हींग

ह्या ट्रीपवरून हे मात्र पाहावयास मिळाले कीं भाऊसाहेब ड्रायव्हींगमध्ये पारंगत झाले आहेत अटलांटा हे एक मुंबई सारखे गजबजलेले व फार मोठे गाव

असल्याने, ' down town ' ह्या अती गर्दीच्या भागात मोटारींना थांबायला लागू नये म्हणून उंचावरून भक्कम ' Free way , (फ्री वे) बांधलेली आहे हा आठ लेनचा रस्ता बरेच मैल गोल, गोल जातो दोन्ही बाजूनी आपल्याच दिशेला व एका बाजूने विरुद्ध दिशेला गाड्या भराभर वेगाने धावत असतात आपले आवसान व तोल साभाळून आपली मोटार चालू ठेवावी लागते पुढे काढतांना सिग्नल देऊन चटकन् घुसावे लागते स्पीड सुमारे ६० मैल तासास. फारच मजा आली

* * *

# ७

## 'घोस्ट टाऊन', 'बून', आणि मशिलें

दिनांक १ सप्टेंबर १९७३ रोजी सकाळी ९-१० ला निघालो तो नॉर्थ कॅरोलायना ह्या शेजारच्या प्रांतामधील बुन ह्या डोंगर माथ्यावरील थंड हवेच्या ठिकाणी कनिष्ठ चिरंजीव आप्पासाहेब यांच्याकडे दुपारी २-४५ ला येऊन पोहोचलो जेवण करुन सध्याकाळी त्या उभयताच्यासह पुन्हा सध्याकाळी लगेच ७-१५ ला निघालो तो २०० मैल दूर ॲशव्हिलाला आलो रात्र झाल्यामुळे येथे राहण्याचे ठरविले परंतु काही केल्या एकाही हॉटेलमध्ये जागा मिळाली नाही कारण हा लेबरडे वीक एन्ड् होता व त्यात हा शनिबार म्हणजे रजेचा-दिवस होता. इकडे शनिवार-रविवार म्हटला म्हणजे काणी कोणाचा लागत नाही दर वीक एन्ड दिवशी (Week end) आपापल्या प्रेम पात्राना बरोबर घेऊन मजा उडवावयाची असते आपल्याकडे जादा कामे रविवारवर ढकलून आपण देत असतो शेवटी मी एका हॉटेलच्या मॅनेजरला भेटून विनती केली की आम्ही इंडिया मधून आलो आहोत येथे आमचे कोणीही नाही आमच्या बरोबर ३ स्त्रिया आहेत त्याच्यासाठी तरी रात्री-पुरता बसावयास एखादा कोपरा द्या परतु त्यानी साफ नकार दिला

यावरून अमेरिकन बिझनेसमन्ना हृदय नसते असें क्षणभर वाटले आता काय करावयाचे ते समजेना कारण गाडी कोठेही उभी करुन बसलो तर लगेच पोलिस दडाचे कार्ड देणार ! तेव्हा फिरत राहीलो व अपरात्री सामसूम झाल्यावर एका चर्च जवळील हॉटेलात कांही घेण्याचे निमित्ताने गाडी उभी केली व गाडीतच एकमेकाच्या अगावर रेलून डुकल्या घेतल्या भाऊसाहेबाची 'वॅगन' गाडी खूपच मोठी असल्यानें तीन जणाना आडवे झोपता आले एक गादी मागे पसरलेली होतीच त्या गाडीची किंमत आज खरी वसुल झाली, म्हणायची. अर्थात् हॉटेलात न राहिल्याने रात्रीचे सुमारे डॉलर ५० (रुपये ४०० वाचले.)

## 'घोस्ट टाऊन'

भल्या पहाटे उठून गाडी हाकलली व "घोस्ट टाऊन" ला आलो हा भाग मोठा थोरला कडा तुटून सरळ उताराचा झाला आहे येथे आम्ही आवडी-प्रमाणे काही झुलत्या रेल्वेसारख्या डब्याने व काही बकेटने (पाळणा) वर आणले गेलो इतके उच की वर बकेट येण्यास १५ मिनिटें लागली असावी येथे काळ्या निग्रो गुलामाच्या जीवनातील प्रसग प्रत्यक्ष पाहता आले त्याच्याशी लढाई करुन त्याचे मुडदे पाडूनही लटोपटीचे दाखवितात. एका ठिकाणी तर एकाला फासावर चढवून तो लटकत असलेला पाहावयास मिळाला येथे १२८ प्रकारचे राइड्स् होते काही काही मोठे गमतीदार होते याशिवाय गोऱ्या मुलीचा डान्स पाहावयास मिळाला डान्स म्हणजे काय? तर चावटपणाचे हावभाव करुन उघडया नागडया अगाने अग विक्षेप करुन दाखविणे. येथे सेन्ट हेलेना येथील हद्दपारीमध्ये नेपोलियन खेळत असलेल्या बुद्धिबळाच्या खेळाचे सर्व हस्तिदती साहित्य पाहावयास मिळते तसेच येथें गुलाबाचे ५००० प्रकार सापडतात असे सागितले जाते नतर फ्रॉन्टिअर लॅंड, (Frontier Land) ब्लू रिजमा माऊटन (Blue Ridge Mountain) येथील सृष्टीसौन्दर्य पहात, पहात शेवटी रात्र होऊन, पहाटे बूनला परतलो

"अॅपलाचियन लाइन" हा डोंगर पेन्सिल्व्हानिया प्रात, नॉर्थ कॅरोलाईना प्रात ते टेनेसी प्रांत अशा अनेक सस्थानांमध्ये पसरलेला आहे स्मोकीमाऊटन, नॅशनल

पार्क वगैरे फेडरल गव्हर्मेन्ट व स्टेट गव्हर्नमेंट यानी रोखून ठेवले आहे वोस्ट टाऊन व फ्रॉन्टिअर लॅंड यामध्ये गोरा शिरू शकत नव्हता परंतु गोऱ्यांनी रेड इंडिअन्सची कैक वर्षे ढोरासारखी कत्तल करुन या भागामध्ये प्रवेश मिळविला. ही गोष्ट सुमारें दोनशे वर्षां मागचीच जुनी आहे

येथे बूनला आम्ही उभयता राहिलो व भाऊ वगैरे मंडळी समटरला परतली.

## इकडचे एक माथेरान 'बून'

बून हे गांव लहान असून जवळ जवळ विद्यार्थ्यांचेच गाव आहे असे म्हटले तरी चालेल तरी सुद्धा हे गावही कसे अद्ययावत् आहे! डिपार्टमेंटल स्टोअर ३-४ पाहिले एवढे मोठे व सुंदर पण हे कसे चालतात हेच मला समजत नाही युनिव्हर्सिटी तर एवढी मोठी आहे की मी विचारच करीत बसलो, की एवढा पैसा आणतात तरी कोठून? नंतर विचारता कळले की अमेरिकेत हिच्यापेक्षा कितीतरी पटीने मोठी विश्वविद्यालये आहेत हे तर काहीच नाही,

याठिकाणी मन थक्क करुन सोडणारी यंत्रें प्रथम कपडे धुण्याचे व कपडे वाळविण्याचे अशी दोन यंत्रें पहावयास मिळाली ठराविक नाणी आत टाकली म्हणजे एका 'लोड्' ला सुमारे ३५ सेंटस म्हणजे सुमारे पावणेतीन रुपये टाकले की यंत्र सुरु होते. आपोआप पाणी आंत येते व रविप्रमाणें उलटसुलट दांडा फिरत राहतो यामुळे कपड्याचे घुसळण चालू राहते ठराविक वेळी हे पाणी निघून जाते व दुसरे स्वच्छ येते, नंतर हेही निघून गेल्यावर यंत्र थांबते हे थांबले की समजावे की धुणे संपले. याकरता सुमारे ४० मिनिटे लागतात भाऊसाहेबांच्या घरी मशीन आहे. तसेंच पण घरी पैसे टाकावे लागत नाहीत साहजीकच! नंतर हे कपडे काढून दुसऱ्या 'ड्राईंग' मशीनमध्ये टाकावे लागतात यात पैसे टाकले की हेही यंत्र चालू होते व ठराविक वेळी थांबावे याकरता पांच मिनटास पांच पेनीज म्हणजे ४० पैसे पडतात हे वाळलेले कपडे त्या गोल यंत्राच्या बाजूला चिकटल्यासारखे राहतात. दोन्ही यंत्रावर माहिती दिलेली असते एकूण किती वजनाचे कपडे टाकावयाचे, (नेहमीच्या यंत्रामध्ये ८ पौंड)

पैसे किती टाकावयाचे, साबू किती टाकावयाचा वगैरे याठिकाणी आणखी पुष्कळ यंत्रे पाहावयास मिळाली यामध्ये पैसे टाकले की, तिथे ठेवलेल्यापैकी हवी ती वस्तु त्या नंबरचे बटन दाबले की मिळते विशेष असे की लोकाना अत्यंत षोक असलेल्या कोक (कोका कोला) च्या बाटल्यादेखील बटन दाबले की मिळतात लगेच जवळच असलेल्या ठिकाणी झाकण काढून कोक प्याल्यावर बाटल्या फेकून देण्यासाठी कचऱ्याकरता (garbaye) पिप ठेवलेले असते. त्यातच त्या टाकावयाच्या असतात रस्त्यावर कागदाचा कपटाही दिसावयाचा नाही कोणी टाकला की लगेच आली पोलीसाची गाडी असे समजावे.

आणखी यंत्रेही येथे पाहावयास मिळाली पैसे सुटे करण्याचे यंत्र यात मोठे नाणे टाकले की त्याची सुटी नाणी बाहेर पडतात परंतु विशेष गमत वाटली ती एका वेगळयाच यंत्राची हे यंत्र असे आहे की, डॉलरची नोट यात ठेवली की पैसे सुट्टे होऊन मिळतात परंतु ही विशेष गमत वाढली जाऊन दुणावली ती अशासाठी की ही नोट ठराविक पद्धती व्यतिरिक्त दुसऱ्या पद्धतीने टाकल्यास नोट बाहेर फेकली जाते शिवाय खोटी नोट असल्यास सुटे पैसे येत नाहीत हे कसे काय ? ते इंजीनिअरनी शोधावे माझा अंदाज असा चालतो की यंत्राच्या आत फोटो काढण्याच्या कॅमेराप्रमाणे काही तरी व्यवस्था असावी.

* * *

# ८

## ऐतिहासिक किल्ला

दिनांक ६ ऑक्टोबर १९७२ रोजी चार्लस्टन् बंदरामधील 'फोर्ट समटर' (ऐतिहासिक समटरचा किल्ला) पाहिला इसवी सन १८१२ च्या लढाई-नंतर मध्य सरकारनी किनारा संरक्षणार्थ फोर्ट जॉन्सन् मौल्ट्री व समटर आणि कॅसल पिन्कनी नावाचे तीन किल्ले बांधून नाके बंदी केली. समटर फोर्टला यादवी युद्धामध्यें साऊथ कॅरोलायनामधील योद्धा व नेता थॉमस् समटर याने पुढाकार घेतला म्हणून त्याचेच नांव दिले आहे हा बांधावयास १८२९ ते १८६० पावेतो ३१ वर्षे लागली हा 'चार्ल्स्टन' ह्या मोठ्या बंदराच्या हार्बर-मध्ये कृत्रिम बेट तयार करून त्यावर बांधला आहे जवळच फ्लोटिंग बॅटरी नांवाचे दारूचे कोठारही बांधले आहे. नवीन कुपर रिव्हर ब्रीज नावाचा पूल १९२९ मध्यें बांधला हा जगामध्यें सर्वांत जास्त उंच आहे हा किल्ला पहाण्याकरतां म्युनिसिपल यॅटबेसिन बंदरातून सहल (tour) बोट सुटते ही खास बोट अत्यंत सुंदर व स्वच्छ असून यांत उत्तम प्रकारची बाके हॉटेलही आहे हॉटेलमध्ये पुस्तके विनामूल्य माहिती पत्रकें ठेवलेली असतात किल्ला पाहण्याकरिता डॉलर्स २॥ चे तिकीट (सुमारे रु. १० प्रत्येकी) घ्यावे लागते

व तो पाहाण्यास २। तास लागतात

## 'फोर्ट समटर' वरील यादवी युद्धाचे पान

किल्ल्यावर मध्य सरकारचे लष्कर होते, बंडवाले कॉन्फिडरेट् यानी तो सोडून जाण्यास सांगितले हे न ऐकल्याने संस्थानासंस्थामध्यें लढाई सुरू झाली. दि १२ एप्रील १८६१ रोजी पहाटे ४-३० वाजता फोर्ट जॉन्सनच्या बाजूने प्रथम तोफेचा गोळा येऊन पडला ३४ तास एकसारखा मारा होऊन किल्ल्याचा चक्काचूर झाला अखेरीस दि १४ एप्रील रोजी मेजर रॉबर्ट अँडरसन् याने किल्ला सन्मानाने सोडण्याचे कबूल केले यावर जगद्विख्यात प्रेसिडेंट अॅब्रॅहॅम लिंकन्ने ७५००० चे सैन्य उभे केले व देशभर लढाईचे वातावरण निर्माण झाले ह्या कृतिबद्दल नतर फार चर्चा झाली मध्यसरकारने हर प्रयत्न केले तरीसुद्धा हा किल्ला ४ वर्षे बंडवाल्यांच्या कॉन्फिडरेटांच्या ताब्यात होता. एप्रील १८६३ ते फेब्रुवारी १८६५ मध्यें बंडखोर मध्यसरकारने मारा तीव्रतम केला व शेवटी जनरल शेरमननें सबंध चार्लस्टन् गाव खाली करावयास लावून कब्जा केला हे गाव 'साऊथ कॅरोलाईना' प्रांताची राजधानी होती

किल्ला दाखवून माहिती सांगण्याकरता सरकारने गाईड् ठेवला आहे त्याचा नेहमी लष्करी पेहेराव असतो यानी माहिती उत्तम प्रकारे दिली व आमच्या शंकाचेही निरसन चांगले केले आंतील भाग स्वच्छ असून वस्तू जिकडच्या तिकडे नीट मांडल्या आहेत प्रदर्शनामध्ये वस्तू, नकाशे, माहिती पत्रकें भरपूर ठेवलेली आहेत, गाइड्ला विचारता तो म्हणाला मी M A चा अभ्यास करीत आहे येथे नोकर नसतात असे विद्यार्थीच कामें करतात व फुकट काम नाही, याला पैसे भरपूर मिळतात

जाता जाता येथे एक चमत्कारिक धाडस पाहावयास मिळाले एक नूतन जोडपे लहानशा होडीमधून फिरावयास गेले होते होडीचा पुढचा भाग पाण्यात बुडू लागला ते जोडपे घाबरलेले दिसले म्हणून आमच्या कॅप्टनने आमची बोट

तिकडे वळवली आम्ही सर्व उतारु आपापल्या दुर्बिणी लावून छातीचे ठोके मोजीत बसलो कारण आम्हाला वाटले की हे जोडपे क्षणार्धात जलसमाधी घेणार पण जवळ गेलो तरी त्याची हालचाल आमच्या बोटीत येण्याची दिसेना कॅप्टनने बोट मागे फिरवली व आमच्या मार्गाला लावली एवढ्यांत पाहतो तो एक सरकारी बोट मोठ्या वेगानें येतांना दिसली. तिने त्याना मोठ्या शिताफीने उचलून घेतांना पाहिले. वायरलेसने त्यांनी केव्हांच कळविले असावे असा आम्ही या गोष्टीचा अर्थ लावला. धन्य त्या मुली मुलाची व धन्य त्यांच्या धैर्याची ! व सरकारी झटपट कारवाईची !

## एक महत्वाचा ऐतिहासिक म्युझिअम

यानतर वस्तुसग्रहालय (museum) पाहिला आपल्याकडील म्युझिअम-सारखीच परतु खूप मोठी व स्वच्छता आणि टापटीप उत्कृष्ठ

शेवटी "गुलामाचा बाजार" '(स्लेव्ह मार्केट)' पाहिला याला आता "जुन्या गुलामाच्या बाजाराचा वस्तु सग्रहालय" (ओल्ड स्लेव्ह मार्ट म्युझिअम) असे म्हणतात, कारण आता गुलामांच्या विक्रीचा धदा कायद्याने बद झाल्यामुळे गुलामाच्या व्यापाराचा धदा चालत नाही

'यादवी युद्धाच्या' पूर्वी या ठिकाणी गुलामांचा लिलाव करणाऱ्यांच्या अनेक कचेऱ्यांपैकी एक कचेरी होती या ठिकाणी आज दस्तैवज, नकाशे, गुलामोच्या इतिहासाची चित्रें असून त्याच्या हस्त कौशल्याच्या वस्तू आहेत. हे मार्केट १८२० साली बाधले

## थोडासा इतिहास

१६७० साली इग्रज वसाहतवादी विल्यिम सयलेच्या नेतृत्वाखाली पहिली कायमची वसाहत करण्यासाठी चार्लस्टन् बदराजवळील ॲश्ले नदीच्या उगमाशी आल्बेमार्ले पॉइट येथे उतरले ही वसाहत स्थापण्यासाठी इग्लडच्या दुसऱ्या चार्लसने चार्टर (हक्क पत्र) दिला म्हणून त्याचे नाव या गावाला चार्लसटाऊन असे पडले व ते पुढे चार्लस्टन झाले यावेळी फक्त ३ जहाजामधून माणसे

आली ती फक्त १५० होती १६७१ मध्ये आणखी २ जहाजे आल्याने २६३ पुरुष'व ६९ स्त्रिया व ५९ मुले एवढी भरली चार्ल्सच्या एजन्टच्या नेतृत्वाखाली आणखी फ्रेंच प्रॉटेस्टट आले १७४८ साली अमेरिकेचा परराष्ट्राशी व्यापार इंग्लडला ७ कापसाच्या गासड्या पाठवून येथून सुरू झाला. १७७५ साली ब्रिटिशाचा झेंडा उतरवून अमेरिकेचा झेंडा येथे चढविला गेला अमेरिकेचे पहिले कॉलेज येथे १७८५ साली निघाले 'फायरप्रुफ बिल्डिंग' प्रथम येथे १८२६ मध्ये बांधली. १८३० मध्ये वाफेची गाडी प्रथम येथे सुरु झाली. कृत्रिम बर्फ जॉन गोरी याने प्रथम येथेच १८५१ मध्ये तयार केला आणि पहिली लढाईत वापरलेली पानबुडी 'हन्ले बोट' या नावानें बडवाले (confederate) यांनी प्रथमच १८६३ साली येथेच वापरली परतु ती १७-२-६४ रोजी भयकर मोठा आवाज झाला व हन्ले आणि त्याचे साथीदार याना घेऊन तळाला गेली ती गेलीच. जार्जटाऊनच्या आसपास १८४० साली अखिल निखिल अमेरिकेच्या तांदुळाच्या उत्पन्नापैकी अर्धे उत्पन्न निघालें.

## बागेमध्ये काम व पोस्टमन्

आज गवत कापणाऱ्या यत्राचा ते बागेमध्ये चालवून अनुभव घेतला. येथे आपल्या दरवाज्यावरील आपल्या पोस्टाच्या पेटीत पाठवावयाची पत्रे चापाने लावून ठेवली की ती पोस्टमन घेऊन जातो. काहीच्या फाटकापाशी दोन पेट्या खाबावर बसविलेल्या असतात एक पोस्टाच्या मेलकरतां व दुसरी वृत्तपत्राकरिता ही वृत्तपत्र सुरु केले की विनामूल्य मिळते. माड्यावर चढून पोस्टमन पत्रे देत नाहीत तळ मजल्यावर ती ठेवण्याची व्यवस्था असते. हा पायी फिरत नाही, तर याला U S A मेलची गाडी दिलेली असते मोटारशिवाय येथें बात नाही मग तो एखादा प्राथमिक विद्यार्थी असो की कचरा नेणारा झाडूवाला असो भगीतर नसतोच सगळा कारभार ड्रेनेजचा आणि तोही अगदी व्यवस्थित

* * *

# १

## कांहीं गमतीच्या भेटी : न्यायाधीश, बातमीदार, व्यायामशाळा, बँक, (मोटार) गाडीची धुलाई व शाळा –

### जज् रिचर्डसन ह्यांची भेट

दिनांक १२।१० रोजी भाऊसाहेबांचे रिचर्डसन् यांचे ऑफीसमध्ये गेलो एक तासभर गप्पा गोष्टी झाल्या ह्यांचे आजोबा स्वातन्त्र्य युद्धामध्ये लढले येथे लष्करी शिक्षण सक्तीचे आहे म्हणून हे जज्‌सुद्धा मिलिटरीमध्यें होते ह्यांच्या बोलण्यातून येथील लोक इंग्रजांचा भयंकर द्वेष करतात असे वाटते साहजिक आहे कारण इंग्लिशांनी जे हिंदुस्थानात अनाचार केले तेच येथेंही केले यांनी चर्चेत चातुर्वर्ण्य व चार आश्रम याविषयी विचारले माझ्या बोलण्यात सिव्हिल वॉरच्या तारखा आल्या त्या आपण अभ्यास पक्का केलेला दिसतो म्हणून बरोबर 'You have studied well' म्हणून आनंदाने हर्षभरित झाले त्यांचे कोर्ट पाहाण्यास ह्यांनी बोलावले आहे. वकील असून वकीलीही करतात. हे येथे कसं काय ते समजत नाही। म्हणून याचा उल्लेख। जज्‌चे निमंत्रण होतेच त्याप्रमाणें

दि. २२ ला कोर्ट चालू असतांना गेलो. काम सपल्यावर त्यांनी जवळ बोलावून पुस्तके उघडून त्यातील मजकूर समजावून सांगून कामाची पद्धती दाखविली. रात्री प्रेसिडेंट निक्सन टी व्ही वर पाहावयास व ऐकावयास मिळाले. ह्याचे मात्र भाषण उत्तम समजलें. कारण उच्चार स्पष्ट, बोलणें शांत व वाचून दाखवलेले.

## न्यूजपेपर रिपोर्टर मुलाखतीसाठी आली

दि १५ रोजी 'डेली आयटेम समटर' (हा 'समटर' गावातील रोजचा न्यूज-पेपर होय) ची बातमीदार 'सुसान तायडो' मुलाखत घेण्याकरतां आली. दीडतास प्रश्न विचारीत होती अधून मधून ती विचारी "आपण परतल्यावर राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये भाग घेणार की नाही ?" Are you going to take in the social and political activities hereafter when you return or not ? 'अलबत् ! निश्चितच !' Ya, of course, by all, means असे म्हणून पुढे म्हटले. "I am thinking of contesting the election of the post of our Municipal Presidentship (here you name it Mayorship) म्हणजे मी ठाण्याचा म्युनिसिपल प्रेसिडेंटच्या जागेसाठी उभा राहावे असे लोक म्हणत आहेत त्याचा विचार करीत आहे दुसऱ्या देशातून आलेल्याची मुलाखत घेऊन प्रसिद्ध करण्याची येथे उत्सुकता फार दिसते. मुलाखत झाल्यावर तिने आमचा उभयतांचा फोटोही घेतला

## येथील नापिक

फक्त केस कापण्याचे डॉलर २-५० म्हणजे रु १८-७५ घेतले, परतु डोक्याला मशीनचा एकदाही स्पर्श कळला नाही. केस कापल्याबरोबर नापिकानें त्याच्या दुकानाच्या तिमाही लॉटरीचे तिकीट विनामूल्य देऊन म्हटले की कौंटर पार्टवर पत्ता लिहून पेटीत टाका. पहिल्या क्रमांकाला थोडे थोडके नव्हे डॉलर १०० म्हणजे रु ७५० मिळावयाचे होते. आपल्याकडे सलूनकारानी गिऱ्हाईक खेचून

वाढविण्यासाठी व टिकवून धरण्यासाठी हे करण्यासारखे आहे केस कापण्याचे मात्र रु १८-७५ घेण्याचे करू नये नाहीतर सगळेच पुरुष पैसा वाचविण्यासाठी मुलीसारखे वा हिप्पीसारखे केस वाढवू लागतील व मी परत आल्यावर अमेरिकेतच आहे की काय असे मला वाटू लागेल.

## Y M C A. एक *व्यायामशाळा* (Young Man's Christion Association)

दिनांक १८ ऑक्टोबर (१९७३) रोजी Y M. C. A पाहावयास गेलो खूप मोठी आहे सर्व प्रकारचे व्यायाम, खेळ, पोहणे वगैरेची उत्तम सोय आहे जिकडे तिकडे चकाचक येथें शिक्षणही दिले जाते फॅमिलीची फी एकदम डॉलर ९० भरले. की-यात पाहुणेही आले गमत सांगावयाची ती ही की व्यायाम केलेले लोक चक्क उघडे नागडे वावरताना पाहिले एक दोन नव्हे, तर जो बाहेर येतो तो असाच, मलाच सकोच वाटला म्हणून मी पटकन बाहेर आलो परतु ह्यांना सकोच भीड हे शब्दच कसे ते माहीत नाहीत असे दिसते. अर्थात हे दिसले एकाच सेक्शनमध्ये मालिश विभागात फक्त. त्याची फिलॉसॉफी असावी की "सर्वांना अवयव सारखेच मग झाकायचे काय? व कशाला? ह्याच प्रकार महिला विभागांतही असतो असे ऐकले.

मुलामुलींची वा वृद्धवृद्धाचीं वाटेल तेथे चुबने म्हणजे आपल्याकडील रगात येऊन हातावर टाळी देणे घेणें वा तपकीर सिगारेट पुढे करणे व तेही सहज सहज निर्विकल्पपणे !

येथे वॉशिग कपनीतून कपड्याबरोबर हँगर्सही मिळतात कपडे तसे हवे असल्यास बॉक्समध्यें घडी करूनही मिळतात

भाऊनी बँकेचे कामकाज दाखविले येथें Drive in Bank म्हणजे "उभ्या उभ्या या आणि जा" ची सोय असते ठरलेल्या खिडकीशी यावे व गाडीमधून न उतरता बसल्या बसल्या पैसे भरावे वा काढावे आणि निघून जावे बँकेत हरप्रकारची यंत्रे पहावयास मिळाली. पैकी नाणी ओतली की ती निवडून

(SORTING) करून बाहेर पडतात हे गमतीचे वाटले मॅनेजरनी कॉफी देऊन आमचे स्वागत तर केलेच पण वर स्पंजाची पाण्याने फुगणारी कार्डे, पेन्सिली, बॉलपेनें, मॅचेसच्या डब्या व बुकलेटस आणि टॉफी इझनावारी भेट-खातर दिले. याचे आश्चर्य वाटले याला म्हणतात धदा, याला म्हणतात जाहिरात बाजी ! त्याना माहिती आहे की आम्ही भारताकडे परतलो तरी आमचे चिरजीव व सून येथे प्रोफेसर आहेत अजून

## 'ऑटोमॅटीक कार वॉश'

दि २१ आक्टोबर रोजी आमची गाडी धुवावयास घेऊन गेलो यक्षिणीची काडी फिरली आणि आमची मोटार आम्हाला आतून बाहेरुन झाडून, धुऊन, वाळवून व वॅक्सिग (पॉलिश) करुन म्हणजे तोड दिसेल अशी आरशा-सारखी होऊन १० मिनिटांत मिळाली ! टायर्सुद्धा नव्यासारखे दिसू लागले. मग बॉडी तर काय विचारता ! आकार काय पडला ते मात्र विचारु नये फक्त डॉलर्स ३-५० म्हणजे रु २६-२५ ज्याप्रमाणें धुणे वाळवणे यत्र घरी असले तरी केव्हा तरी एकदा ४–६ महिन्यानी कपडे वॉशिग कपनीत देतात तसे ४–८ दिवशी गाडी दस्तुरखुद्द धुतली तरी ती दर महिन्याभरानी मशीनखाली धुऊन घेतात

## 'स्कूल ओपन् हाऊस'

सध्याकाळी चांदोबाच्या शाळेत (Alice Drive Junior High School) पालक दिनानिमित्त आमत्रणावरून गेलो मोठा हॉल पण तो गच्च भरला होता सपर्क साधणें हे ह्या दिवसाचे वैशिष्टच होय माहिती पत्रक व थोडी-बहुत मिळालेली इतर माहिती श्री मेहेंदळे महाराष्ट्र विद्यालय, ठाणें याचेकडे पाठविली येथें पुस्तके वगैरे सर्व काही शाळेतूनच बिनामूल्य मिळते त्यांनी मुलांचे सर्व तऱ्हेचे वर्ग दाखवले व शिक्षकाशी ओळख झाली. अशी पद्धत आपल्याकडे आणणें योग्य ठरेल

* * *

(SORTING) करून बाहेर पडतात हे गमतीचे वाटले मॅनेजरनी कॉफी देऊन आमचे स्वागत तर केलेच पण वर स्पजाची पाण्याने फुगणारी कार्डे, पेन्सिली, बॉलपेने, मॅचेसच्या डब्या व बुकलेटस आणि टॉफी डझनावारी भेट-खातर दिले याचे आश्चर्य वाटले याला म्हणतात धदा, याला म्हणतात जाहिरात बाजी ! त्याना माहिती आहे की आम्ही भारताकडे परतलो तरी आमचे चिरंजीव व सून येथे प्रोफेसर आहेत अजून.

## 'ऑटोमॅटीक कार वॉश'

दि २१ आक्टोबर रोजी आमची गाडी धुवावयास घेऊन गेलो यक्षिणीची कांडी फिरली आणि आमची मोटार आम्हाला आंतून बाहेरुन झाडून, धुऊन, वाळवून व वॅक्सिग (पॉलिश) करून म्हणजे तोंड दिसेल अशी आरशा-सारखी होऊन १० मिनिटांत मिळाली ! टायर्समुद्धा नव्यासारखे दिसू लागले. मग बॉडी तर काय विचारता ! आकार काय पडला ते मात्र विचारु नये फक्त डॉलर्स ३-५० म्हणजे रु २६-२५ ज्याप्रमाणें धुणे वाळवणे यंत्र घरी असले तरी केव्हां तरी एकदा ४–६ महिन्यानी कपडे वॉशिंग कंपनीत देतात तसे ४–८ दिवशी गाडी दस्तुरखुद्द धुतली तरी ती दर महिन्याभरानी मशीनखाली धुऊन घेतात.

## 'स्कूल ओपन् हाऊस'

सध्याकाळी चांदोबाच्या शाळेत (Alice Drive Junior High School) पालक दिनानिमित्त आमंत्रणावरुन गेलो मोठा हॉल पण तो गच्च भरला होता सपर्क साधणें हे ह्या दिवसाचे वैशिष्टच होय माहिती पत्रक व थोडी-बहुत मिळालेली इतर माहिती श्री मेहेंदळे महाराष्ट्र विद्यालय, ठाणें यांचेकडे पाठविली. येथें पुस्तके वगैरे सर्व काही शाळेतूनच बिनामूल्य मिळते त्यानी मुलाचे सर्व तऱ्हेचे वर्ग दाखवले व शिक्षकांशी ओळख झाली अशी पद्धत आपल्याकडे आणणें योग्य ठरेल

* * *

# १०

## अमेरिकेतील दीपावली, 'ड्राईव्ह इन् सिनेमा' आणि बायबल

### *अमेरिकेंत दीपावली*

आज दिनांक २७ ऑक्टोबर १९७३ रोजी दिपावली. भाऊनीं सर्व हिंदवासी-याना रात्री पार्टी दिली. यामध्ये महाराष्ट्रीय, गुजराती, हैद्राबादी, मुसलमान व एकाची पत्नि अमेरिकन असे गमतीचे जातीय, प्रातीय, धर्मीय मिश्रण होते बहुतेक सर्व डॉक्टरेट घेतलेले व घेणारे असून एक जण आफ्रीकेमध्ये हिंदुस्थानचे फॉरिन् मिनिस्टर होते बहुतेक सर्व प्रोफेसर होते प्रथम माझ्या किर्तनाचा व नतर सर्वाच्या गाण्याचा कार्यक्रम झाला बूनहून आप्पासाहेब मडळीही आली होती भाऊसाहेब व सूनबाई (सविता) यानी बिदागी म्हणा की भेट म्हणा किंवा मातापिता पूजा वा दक्षिणा म्हणा डॉलर्स १००० दिले. (रु. ८०००) नतर भारतीय पद्धतीने जमिनीवर (गालिचावर) बसून जेवणे झाली. हे यावेळी वैशिष्ठ्य होते सूनबाईने भारतीय पदार्थही केले होते. अर्थात या प्रसगाचे फोटो, फिल्मही काढल्या हे सांगावयास नकोच नोव्हेंबर

१ रोजी प्रोफेसर डॉ मार्था डॅफन् भेटावयास आली ही तासभर गप्पा मारून गेली ही वृद्धा ब्रह्मचारी आहे सध्याकाळी प्रो अमानुद्दीनचा फोन आला की आम्हा उभयताचा फोटो व माहिती "डेली आयटेम" मध्यें आली आहे यापुढे पुष्कळ ठिकाणी आम्हाला वरील वृत्तपत्र वातमीमुळें लोक ओळखून विचारू लागले, आणि स्मितहास्य करून व मान हालवून आणखीच "हाय् हाय् करू लागले.

## मोटारीतून हॉटेल

दि २ नोव्हेंबर रोजी "ड्राइव्ह इन् रेस्टॉरन्ट्" अनुभवले हॉटेलच्या बाहेर मोकळ्या जागेवर खाब पुरलेले असून त्याला टेलिफोन, लाईट व मेनूची यादी लावलेली असते गाडी उभी करून कॉल केला की वेटर नोटबुक पेन्सिल घेऊन येतो व ऑर्डर नोदवून घेऊन ती पुरविनो. निष्कर्ष काढला की आळशी, वृद्ध वा बालके यांना उतरावयास नको म्हणून ही कल्पना निघाली असावी. पण या सोयींचा विशेष फायदा प्रेमी युगलांना असतो असे कळले गाडीतच आतल्या आत किसिंग करीत करीत खावे प्यावे व पुढील चाळे करावे. बाहेर पडल्यास तिचा दुसरा लव्हर वा त्याची दुसरी लव्हरेस यानी पाहिले तर? उगीचच पिस्तुले निघून खटाखट–ठो ऽऽऽ व्हावयाचे।

## चालती-फिरती वास्तु (mobile home)

जशी होमची, तशीच "बक बेड" ही वापरण्याची येथे बरीच पद्धत आहे बक बेड (Bunk bed) म्हणजे रेल्वेच्या मिलिटरी डब्यातल्याप्रमाणे एकावर एक बिछान्याची सोय. यामुळें जागा खूप वाचते म्हणून आम्ही एक आणला.

## मोटारीतून सिनेमा

दि ५ नोव्हेंबर रोजी आप्पाप्रमाणे भाऊनीहो एका सिनेमाला आम्हाला नेऊन बसविले व पुन्हा घेऊन जाण्यास येतो म्हणून म्हटलें कारण त्याना कॉलेजची

परीक्षेची प्रश्नपत्रिका काढावयाची होती. कारण ते "ड्राईव्ह इन" थियेटर (Drive in Theatre) होते येथे मागील वाहनातून रेस्टॉरट प्रमाणे ठायी ठायी खांब होते व त्यांना अडकवून ठेवलेले लाऊडस्पीकर होते ते आपल्या गाडीमध्ये घेऊन कानाने बसल्या बसल्या ऐकत होतो व समोर मोठ्या पडद्यावर डोळयाने पाहात होतो एक प्रसग असा दाखविण्यात आला की एक गोर स्त्री सपूर्ण टॉपलेस व बॉटमलेस होऊन बऱ्याच लाबून आली व काळ्या हिरोबरोबर तिने शय्यामैत्री कितीतरी वेळ केली. हीच गोष्ट पुन्हा अशीच काळ्याकाळ्याची दाखविण्यात आली पहिल्या वेळी टाळयाचा कडकडाट कितीतरी वेळ चालू राहिला. पण दुसऱ्या वेळी नव्हे कारण एकच गोऱ्याचा भयकर तीव्र मत्सर! आणि हे पिक्चर 'PG' शेरा युक्त असे होते, म्हणजे लहान कोवळ्या मुलांबरोबर Parents वा Guardians असले म्हणजे त्याना बघावयास परवानगी नाहीतर एकट्या दुकट्याला नाही आश्चर्य वाटते ते याचे की असली पिक्चर्स काढणारे काढतात कसे? त्यांना चारित्र्य व शील याची आवश्यकता भासत नाही, त्याना फक्त पैसा पाहिजे असतो असे मानले तरी सरकार व आई-बाप आणि पालक हे मुलांना म्हणजे भावी पिढीला बिघडवून राष्ट्रात स्त्रैण्य निर्माण करीत आहेत व याकरिता गुन्हेगार ठरत आहेत दोषातून त्याची सुटका नाही नव्हे नव्हे मीच चुकत आहे की काय कदाचीत! कारण येथे लोक म्हणतात माणसाचे जीवन हे भोगासाठी आहे (Life is for enjoyment) त्यागासाठी नव्हे आणि शिवाय मुलाना नाहीतर माहिती कशी होणार?

## धर्मभोळेपणा

शेजाऱ्याने Holy Bible वाचावयास आणून दिले याच्या बायकोने जिआजिबाने तर एक बायबलची प्रतच भेट म्हणून मला आणून दिली यांत म्हटले आहे जेरुसलेम येथील देऊळ बाधण्याकरता नुसत्या इस्रायल राजानेच १,००,००० टॅलेन्ट सोने व १०,१७,००० चांदी दिली (टॅलेन्ट म्हणजे ग्रीसमध्ये वजनाने ५७ पौंड व हिब्रुच्या म्हणण्याप्रमाणे ९३-७५ पौंड) आणि या कामाकरता

१,८४,६०० माणसे लागली पैकी ३,३०० ओव्हरसियर, ८०,००० लाकूड ताड, ७०,००० कामगार व इतर हरप्रकारचे कलाकार दरवर्षी अमेरिकेत १,५०,००,००० बायबलच्या प्रति व जगामध्ये २,५०,००,००० छापतात. ह्याची १२०० भाषात भाषांतरे झाली आहेत. १६०० वर्षांत ३६ लेखकांनी ६६ ग्रंथ निर्माण केले हे सर्व मिळून बायबल घडले आहे

* * *

# ११

## 'सिटी गव्हर्नमेंट,' छापखाना, व वृद्धालयाला भेट, घरी ढुढ्ढाचार्य व 'थँक्स गिव्हिंग साजरा'

### *मुलांना प्रोत्साहन*

दिनाक ७ नोव्हेंबर रोजी सर्व विषयांत आमचा नातू चद्रशेखर याला A' वा B' grade मिळाल्या (म्हणजे ९०–१०० व ८०–९० मार्क) म्हणून एका रेस्टॉरटने त्याला पार्टी दिली तसे त्यांनी जाहीरच केले होते इकडे ही पद्धत मुलाना उत्तेजन देण्यासाठी फार चांगली असून आपल्याला अनुकरणीय आहे. थडी असह्य पडू लागली आहे दरवाजा उघडत नाही परतु आंत थडीची आठवणही येत नाही, कारण घरोघरी थडी वाजली की हीटर व उकाडा वाटला की कूलर कळ दाबली की चालू होतो. मोटार गाडीतही दोन्ही आहेतच हे हे माग म्हटलेच आहे.

### *मेयरना भेट*

दिनाक १३ नोव्हेंबर रोजी भाऊसाहेबांचे स्नेही श्री. हेन्री मोझेस यांचे ऑफीस दाखविण्याकरिता नेले हे मेयर आहेत बैठक सिटी हॉलमध्ये भरली होती.

कार्यक्रम पत्रिके (Agenda) वर आमची नावे व्हिजिटर म्हणून अगोदर घेतली होती एकूण पाच सभासद यामध्ये एक स्त्री होती अवांतर १० लोक होते यामध्ये एक्स्पर्टस्, बातमीदार, पोलिस वगैरे मंडळी होती माननीय मेयरनी माझे विचार मांडण्याबद्दल सुचविले. परंतु मी म्हटले कामकाज चालू द्या ते पाहिल्या वर बोलेन 'How there are only 5 members? I am glad to see the discass-ions going on so smoothly and quietly" वगैरे बोललो (म्हणजे, फक्त पांचच सभासद कसे? चर्चा फारच खेळीमेळीने होताना दिसते? स्त्री सभासदानी दोन मार्मिक प्रश्न विचारले "ठाण्यात मतदान किती होते? व सदस्यांना पगार किती असतो" कमीत कमी ६०।६५ टक्के मतदान होतेच. पण हेही प्रसगी ८० टक्केच्याही वर चढते, व पगार मुळीच नाही, हे ऐकल्या-बरोबर मंडळी चकीतच झाली. कारण येथे अमेरिकेत मतदान चांगले होत नाही व पगाराशिवाय कोणीही काम करीत नाही शेवटी आभार मानतांना मेयरनी एक 'KEY' (किल्ली) सुंदरशा डबीमध्ये घालून भेट म्हणून दिली येथे सन्माननीय पाहुण्याना अशी चावी देण्याची पद्धत आहे कल्पना अशी की गावाचे मुख्यद्वार पाहुण्यांच्या हस्ते उघडून गावात पाहुणे शिरल्यावर सर्वांनी यावयाचे दोन चार दिवसापूर्वीच इंग्लंडमधून कोणी पार्लमेंटची (M. P.) महिला आली होती तेव्हा त्याना अशीच चावी दिल्याचे वाचले होते म्हणून चावी स्वीकारताना माझी छाती फुगून आली. मान ताठ झाली व ही कशा करता असे बावळटपणाने विचारल्याचा प्रसंग आला नाही.

## *आमच्या घरीं अमेरिकन हुद्दाचार्यांचा सन्मान*

दिनांक १२ नोव्हेंबर रोजी भाऊसाहेबानी त्यांच्या अमेरिकन मित्राना मेजवानी दिली यात सेक्रेटरी, चेंबर ऑफ कॉमर्स, मॅनेजर, सेव्हिंग्ज व हाऊस लोन बँक, प्रोप्रायटर, ऑटो वर्क्स, प्रेस रिपोर्टर्स वगैरे प्रमुख मंडळी होती रात्रीपर्यंत खूपच गप्पा झाल्या. घर आणखी मोठे असते तर बरीच माणसे बोलावता आली असती.

आज घरामध्ये हवा आत ओढून घेण्याच्या तत्वावर तयार केलेले यंत्र व्हॅक्युअम क्लीनर वापरून पाहिला तो सुरु करुन फिरवला कीं सक्शन्च्या योगाने कोना-कोपऱ्यातला केरकचरा आंत पाइपमध्ये ओढून घेतला जातो.

## अमेरिकन् छापखान्यास भेट

दिनाक १४ नोव्हेंबरच्या वृत्तपत्रात आम्ही कौन्टीकौन्सिलच्या सभेला उपस्थित राहिल्याचे वृत्त आले सध्याकाळी येथील मोठ्यात मोठा छापखाना पाहिला. येथे एक यत्र एकाच वेळी ४ रगामध्यें काम करते ते पाहिले आमचा पूर्वी प्रेस ठाण्यात असल्याने मला चार रगात छपाईची सोय फारच विशेष वाटली

## वृद्धांची खास सोय

दिनाक २२ नोव्हेंबर रोजी वृद्धांचे Hope well Nursing Home (होपवेल नर्सिग होम) पाहिले मुख्य बाईनी माहिती दिली व चार शद्ब सागा म्हणून म्हटले. एक राऊड घेऊ व नतर मी बोलेन असे सागितले. मान्य या ठिकाणी म्हातारे, कोतारे, दीनदुबळें, आजारी, अतिवृद्ध असे हर्‌प्रकाचे लोक होते (गरीब मात्र नव्हेत) व्यवस्था उत्तम व टापटीप चांगली आढळली या ठिकाणी एक बाई १०४ वर्षांची आढळली मी अर्धातास व्याख्यान दिले. बायबलमधील दहा ईश्वरी आज्ञा (TEN COMMANDMENTS) पैकी पाचवी आज्ञा "आपल्या माता-पिता यांचा आदर करा", (Honour the Fathar and Mother.) ही गोष्ट तर हजारो वर्षांपूर्वीपासून आमचा धर्म सागत आहे मातृ देवो भव । पितृ देवो भव । आणि वर म्हणतो आचार्य देवो भव । अतिथी देवो भव । आणि मला तर खेद होतो हे चित्र बघुन कीं वृद्ध, दुबळे, न कम्मी माता-पिता, यांना येथे आणून टाकले असून त्याचे चेहरे कसे निरस, आसुस, उतरलेले व केविलवाणे झालेले आहेत हे पाहून कोणाची हत्या करु नका. कोणाला लुबाडू नका (Thou shalt not kill. Thou shalt not steal) याचा उल्लेख करून म्हटले "तर मग लढाया का होतात?

अमेरिकेजवळ सर्व कांही आहे फक्त चिरकाल शाती नाही. हीच तर जीवनामध्ये अत्यत महत्वाची संपादन करण्यासारखी गोष्ट आहे (America has got every thing but not the main thing namely Eternal Happiness' Which is the most important thing to be achived in life for which you shall have to resort to us ) असे म्हटले व सांगितले की आम्हा गरीब असू परतु तरीसुद्धा आम्ही सुखी असू कारण हेच तर आमच्या गीतेचे तत्व आहे की तुम्ही विजयी झालात किंवा पराभवामुळे आनद पावून उड्या मारु नका किंवा दु:खी होऊन रडत बसू नका तर समतोल स्थितप्रज्ञ व्हा (We may be poor, or worring, but even then we may be happy Beacause that is the guiding principle of our Geeta that Be!balanced Neither be sorrowful nor be joyful under any circumstance even though you succeed or fail.) दोन स्त्रियानी प्रश्नही विचारले पैकी एक होता हिंदु प्रार्थनेचा प्रकार वृत्तपत्रात ह्या बाबतीत रिपोर्टही आला आहे

## *"थँक्स गिव्हिंग" ची कथा*

आजचा येथील Thanks Giving चा दिवस महत्वाचा सुट्टीचा दिवस होय. याची कथा अशी

सप्टेंबर सन १६२० साली ९० फूट लाबीची "मेफ्लॉवर" नावाची बोट १०२ रबान्या घेऊन इग्लडहून निघाली ह्या सफरीला त्यांना ६५ दिवस लागले महासागर ओलांडल्यानतर सदरहू यात्रेकरु उतरण्यासाठी चागली जागा पाहाण्याकरता महिनाभर पाण्यातच फिरत राहिले अखेरीस ते मॅसॅच्युसेटस ह्या अमेरिकेतील प्रातामधील पलायमाऊथ येथे डिसेबर महिन्यात उतरले. रेड् इडियन् योद्धा स्क्वॅन्टो यानी या यात्रेकरुना धान्य, कडधान्य, फळे यांचे पीक मासाचे खत घालून उत्तम प्रकारे कसे काढायचे ते शिकविले ह्या नवीन आलेल्यापैकी १६२० च्या कडक हिवाळ्याच्या भयकर थडीमधून जे वाचले. त्यानी पहिला Thanks Giving, Feast चा दिवस मोठ्या आनंदाने साजरा

केला अर्धे अधिक यात्रेकरु केव्हाच स्वर्गवासी झाले होते. गव्हर्नर ब्रॅडफोर्ड यांनी ९० रेड इंडियनना निमंत्रण दिले होते हा उत्सवाचा समारंभ २७ ऑक्टोबर १६२१ साली ३ दिवस करण्यात आला हे ह्या दिवसाचे महत्व होय या दिवशी प्रत्येक गावातून खूप मोठी परेड येथे होत असते सर्व प्रांतीय व मध्य सरकारी ऑफीस बंद असतात.

* * *

# १२

## यांत्रिक डेअरी, इन् सेमिनेशन, गाण्याचा कार्यक्रम आणि चर्चला भेट

### *यांत्रिक डेअरी*

दिनांक २३ ऑक्टोबर रोजी बटलर यांची डेअरी पाहिली ही हा स्वतः मुलगा व जावई चालवितात जमीन सोडून डॉलर्स ३५ लक्ष यांनी या धंद्यात घातले आहेत १५० गाई ५० भाकड (आलटून, पालटून) अशा एकूण २०० गाई यांनी पाळल्या आहेत म्हैस येथे औषधालाही नाही त्यांना कापून काढून त्यांचे बीजच नष्ट केल्यासारखे आहे गाई दूध ५ व्या वर्षापासून १५ व्या वर्षापर्यंत देतात असे कळले नंतर, विचारता सांगण्यात आले की, अखेरीस यांची रवानगी मृत्युच्या दाढेत होते त्यांचे म्हणणे की जसे Life is for enjoyment (जिवन हे चैनीसाठी आहे.) किंवा ३ वेळा तलाक, तलाक, तलाक असे म्हटले की मुसलमानांमध्ये काडीमोड होते किंवा जणू काही स्त्रीला आत्माच नाही, त्याप्रमाणे गाय ही वस्तू खाण्यासाठीच असते असे त्यांचे म्हणणे गाई येथे कमाल ६० पौण्ड दुध देतात व सरासरी ३५ पौण्ड असते असे त्यांचे म्हणणे आहे

गोठ्याच्या एका बाजूला मोठा थोरला माळ गुरचरण म्हणून येथे राखून ठेवला आहे. हिरवेगार गवत उगवलेले लांबच लांब पसरलेले असल्यामुळे असें वाटले की आपणही चरावयास जावे ! दुसऱ्या बाजूला १५० फूट उंच गवत गोल, भव्य व उंच टाकीमध्ये जनावरांच्या खाण्याचा साठा साठवून ठेवलेला आहे यामध्ये गवताचे राई राई एवढे तुकडे मशीनने होऊन आतून एका पन्हाळीवाटे मशीनच्या साह्याने आत जाऊन पडतात आणि हवे तेव्हा त्यातून ते यंत्रानेच निघून गुरांच्या गवाणीमध्यें जाऊन पडते ही कृती मजेशीर वाटलीच परंतु विशेष गमतीची वाटली ती गाई पिळण्याची आणि आर्टिफिशिअल ब्रीडिंगची. येथे जनावरे बांधीत नाहीत सर्व बाजूनी बंद केलेल्या बखळीमध्यें मोकळी ठेवतात. पिळण्याची वेळ झाली की एकेकीला एका खोलीमध्यें घेतात त्याही क्यू करून माणसाप्रमाणे उभ्या राहतात दुसऱ्या तऱ्हेने त्यांना उभे राहताच येत नाही अशीच काही और व्यवस्था केली आहे येथे त्याच्यापुढे खाणे ठेवलेले असते त्यांच्या चारी आचळांना रबरी नळ्या लावतात येथे सक्सनच्या तत्वानुरोधाने जशी डोळ्याची उघडझाप त्याप्रमाणें दाब व सूट अशी कृती सारखी चालू करतात. म्हणजे सड पिळले जातात दूध खाली पडते ते ते पकडण्यासाठी खाली दुसरी नळी असते ती मध्ये ते जमा होऊन पुढे सरकत सरकत एका भाड्यात गोळा होते. आमचा आंगठा धरून बटलरसाहेबांनी नळीत घातला तो आमचा आंगठा आत ओढल्याचे आम्हाला कळत होते.

## कृत्रीम गर्भधारणा (आर्टिफीशिअल् इन् सेमिनेशन्)

दुसरी गोष्ट कृत्रीम गर्भधारणेविषयीची उज्जैनला मुक्काम असतांना आमच्या पाहण्यांत आले ते असे की बीजारोपण करण्यापूर्वी योनीस आंदोलन देऊन संवेदना प्रथम निर्माण करावयाची या गोष्टीत फार वेळ जावयाचा येथे वेगळेच पाहिले प्रथम लालसर बीजयुक्त सुमारे दीड इंचाची नळी गरम पाण्यात ठेवण्यात आली नंतर नळी हालवून बीज पातळ झाल्यावर तो फोडून त्यातले बीज सुमारे दीड फूट लांब नळीत घेण्यात आले यानंतर डाव्या हातात लांबलचक हातमोजे घालून गाईच्या विष्टावाटें हात आंत घालून विष्टा

म्हणजे शेण म्हणजे गोमय ४–५ वेळा काढून टाकण्यात आले एवढे झाल्यावर बीज भरलेली नलिका योनी वाटे आत खुपसून बीज आत सोडण्यात आले Why cowdung was required to be taken out? ('शेण का काढले?') असे विचारून बिजामध्ये ते मिसळू नये व बीजधारक नळी बरोबर गर्भाशयात गेली आहे हे डाव्या बोटाच्या स्पर्शाने कळावे म्हणून असावे ना असे म्हटले तेव्हां 'होय' (ya) बटलरने मान हालविली उज्जैनीच्या पेक्षां हा येथील कृत्रीम गर्भादानाचा प्रयोग जास्त शास्त्र शुद्ध वाटतो तरीपण खरे काय ते व्हेटरनरी डॉक्टरनेंच ठरवणे सर्व कार्यक्रम मात्र गाईला व करणाऱ्याला फारच त्रासदायक आहे असे वाटले

## भारतीय गायन कार्यक्रम

दिनाक २४–११–७३ रोजी रात्री गाणें बजावणे याचा घरगुती कार्यक्रम केला झोपावयास २ वाजले बूनहून श्रीकृष्ण (धाकट्या सूनबाई) गीता आले होते भाऊसाहेबानी तबला, मी पेटी व बाकीची मडळी गायन जेथे असा भारतीयाचा सच आहे, तेथें असे कार्यक्रम करतात म्हणे

## चर्चला भेट

मागे ठरल्याप्रमाणें ह्यांमनी चर्चमध्ये गेलो नेणारी बाई Laos Pastor Robert A alias Bob Norris यानी भाषणात आमचा उल्लेख केला ह्याचें प्रवचन मोठे तळमळीचे झाले. विषय (Call of god) Sacrifice व Separaiton देवाची हाक वर जोर पुष्कळ स्त्री पुरुषानी शेकहॅंड करून विचारपूस केली. परत फिरताना बॉबीना बरे वाटले. दुसऱ्या दिवशी (acknowledgement 'आम्हीं आलो हे बरे झाले' व Thanks giving) पत्र आले गर्दी पुष्कळ होती अशी चर्चे जागो जागी आहेत बोलावणी खूप येतात धार्मिक असणें चागले. भारतीयानी असे केले की त्याना (Fanatic) धर्मवेडे म्हणतात–हे चुकते

* * *

# १३

## केरकचऱ्याचा निचरा व बोलिंगचा गव्हर्नर आणि आंधळ्या मुक्यांना भेट

### *गार्बेज्चा निचरा*

आज दिनांक २७ फेब्रुवारी १९७४ रोजी कचरा नेण्याची व्यवस्था पाहिली पुढे एक ऑटो हिच्या मागे २ माल गाड्यासारखे लहान डबे व शेवटी भला मोठा क्रशर (कचऱ्याचा चूरा करण्याचे मशीन) अशी ही मोटार गाडी आली क्रशरचा मागचा अर्धा भाग कळ दाबली की उघडतो व पुढे असलेल्या कचरा नेण्याचा गाडीचा डब्याचा डबाच यंत्रानी उचलून ड्रायव्हरच्या डोक्यावरून जाऊन उघड्या केलेल्या डब्यामध्ये रिकामा होतो व पुन्हा मागे येऊन जागच्या जागी रिकामा डबा येऊन उभा राहतो.

### *चुटकी सरशी मोटार लायसन्स*

आमच्या दोन्ही गाड्यांचे वार्षिक लायसन्स काढावयाचे होते हे काम दोन मिनिटात झाले बाचाबाची नाही की हाताला हात लावला नाही. फीचा चेक दिला व नव्या पाट्या हातात.

नतर कौन्टी (तालुका) पोलिस ऑफिस पाहिले मुख्य ऑफिसर (Griffin) ने सर्व खोल्यांमध्यें नेऊन सर्व काही नीट समजावून दिले पोलीस विद्यार्थ्यांची खोली दाखविली येथे टी व्ही ठेवलेला आहे याच्या द्वारे एकाच वेळी एकाच प्रकारचे वा विषयाचे शिक्षण सर्व प्रांतभर दिले जाते फोटोची खोली दाखविण्यात आली नतर C I D Chief भेटवले अखेरची खोली हत्याराची होती या खोलीमध्यें निरनिराळ्या प्रकारच्या बदुका, शिरस्त्राणे व चिलखती कोटही पाहावयास मिळाला. अखेरीस सर्वात वरचा अधिकारी शेरीफनांही Mr. Parnell भेटलो हा निवडून आलेला असतो. येथे गोळीच्या प्रभावाने चालणारे जाकिट (Bullet proof) अगात घालून पाहावयास मिळाले.

## थोडे धर्माबाबत

जीझस् क्राइस्ट्सचा जन्म त्याच्या आईच्या विवाहापूर्वी झाला असे ऐकिवात होते परतु होली बायबलमधून माहिती मिळाली ती अशी की ज्यू रुढीप्रमाणे मेरी–जोसेफ याचा साखरपुडा झाला होता हा साधारणपणे लग्नापूर्वी एक वर्ष होत असतो ज्यू कायद्याप्रमाणे साखरपुडा सशास्त्र व पवित्र मानला जातो सशास्त्र विवाहापावेतो ते उभयता जरी एकत्र राहत नसले तरी वधू कायद्याने वराचीच असते त्याच्या साखरपुड्याच्या वेळेच्या आणाशपथा लग्नाच्या वेळेच्या आणाशपथा एवढ्याच विश्वासार्ह व पवित्र असून बधन-कारक असतात. विवाहापूर्व मेरीला मुलगा होणार हे जोसेफ यांस कळले तेव्हां त्याचे विचार, उच्चार, आचार यावर वरील गोष्टीमुळे प्रकाश पडला व त्याचे समाधान झाले जीझस्चा जन्म बेथलेहेम येथे झाला

## एक मजेचा खेळ

दिनांक ५–१२–७३ रोजी "बोलिंग् (Bowling)" खेळ पाहावयास गेलो व नतर तो उभयता खेळलोही. प्रथम तेथे असलेलेच ठराविक बूट घालावे लागतात दोन डोळे व एक नाक अशासारखी बोटे आत घालून

उचलता येण्यासारखे तीन खोलगट खड्डे असलेले ८ पौंड वजनाचे लोखंडी गुळगुळीत गोळे ठेवलेले असतात त्यापैकी एक घेऊन ठराविक अंतरावरून (सुमारे ६०–७० फूट) समोर उभ्या केलेल्या १० जोड्या, (Clabs) चा नेम धरुन चेंडू फेकून गडगडत त्याने त्या पाडावयाच्या असतात त्या पाडण्यावर गुण (Marks) मिळतात वरील जमिनीचा भाग अत्यंत गुळगुळीत केलेला असतो व तो गोळा अथवा चेंडू परत येणे व पाडलेल्या जोड्यांची परत पुढे ७ व मागे ३ अशा त्या तिरप्या रांगेत मांडणी करणे या कृतियंत्राने होत असतात अर्ध्या मिनिटात ही सर्व कृति घडते हा खेळ मुंबईसही आतां आला आहे

## *गव्हर्नर साहेबांची विशेष भेट*

दिनांक ७–१२–७३ रोजी प्रांताचे गव्हर्नर श्री जॉन वेस्ट यांना भेटलो येथे गव्हर्नर निवडून आलेला असतो. ह्यांनी नुकतेच दिल्ली, आग्रा व जयपूर पाहिले. "तुमच्या सारखीच टोपी घालून मी हिंडत होतो" असे त्याचे बोलण्यात आले "थांबा जरा, फोटो काढू या" असे त्यांनी म्हटले तोंच फोटोग्राफर पुढे उभा "एक प्रत तुम्हांकरता पाठवितो" असेही त्यांनी शेवटी म्हटले. त्यांच्या ऑफिसमध्ये चंद्रावर रोवलेला ह्यांच्या राज्याचा झेंडा व व चंद्रावरून आणलेल्या खडकाचे कण फ्रेम करून ठेवलेले पाहावयास मिळाले आगत स्वागत छानच झाले

## *आंधळ्या मुक्यांची शाळा*

नंतर आम्ही आंधळ्या मुक्यांची शाळा पाहावयास शंभर मैल अंतरावर गेलो. ही शाळा सरकार चालविते ही खूपच मोठी असून येथील स्वच्छता व टापटीप वाखाणण्यासारखी आहे

जोडूनच भलीमोठी डॉमेटरी आहे येथे ७०० विद्यार्थी राहतात. आमची गाडी पोर्चशी थांबते न थांबते तोंच प्रवेशद्वाराशी उभा असलेला मिलिटरीचा

ऑफिसर सॅल्यूट करून पुढे झाला व शेकहँड करून "I am here to welcome you" (तुम्हास उतरवून घेण्यास आलो आहे ) असे म्हणून आम्ही उतरल्यावर आमची गाडी पार्क करण्याकरतां घेऊन गेला एवढ्यांत सुपरिन्टेंडेन्ट (Mr. Calhoun) स्वत गाडीवरून खाली आले व ऑफिसमध्यें घेऊन गेले सर्व अधिकारी वर्ग लगेच गोळा झाले व पाऊणतासभर माहिती युक्त चर्चा झाली आणि शेवटी फोटो काढून घेतल्यानतर कॉफीपान झाल्यावर आम्हास सर्वत्र हिंडून निरनिराळे वर्ग दाखविण्यात आले या शाळेत विशेषतः उत्पादन व्यवसायावर जोर दिसला विशेष म्हणजे हातमाग व लेथकाम शिकविण्यात येते अधाच्या वर्ग गमतीचा वाटला. जाड कागदावर यत्राने छिद्रे पाडून त्या छिद्रांच्या विविध मांडणीला अगुली स्पर्श करून अधाना वाचता येते असल्या कागदाचा एक नमुनाही आम्हाला देण्यात आला

दिनांक १० डिसेंबर १९७३ हा आमचा येथील शेवटचा दिवस. आज स्केटिंग् पाहून आलो या खेळाने माणूस अत्यत चपळ होतो असे मला वाटते. हाही खेळ मुबईस आला आहे

नतर रात्री आम्ही येथून निघून आणखी पुष्कळ महत्वाचा भाग पाहून दिनाक १३ रोजी अमेरिका सोडून उजाडतां शनिवार रात्री दिनाक १५ रोजी हिंदुस्थानांत पोहोचलो

* * *

# १४

## अमेरिकेच्या राजधानीस व युनायटेड नेशनस् ऑर्गनाइझेशन्स् यांना भेट आणि परतीचा प्रवास

### *परतीचा प्रवास*

दिनाक १० डिसेंबर १९७३ रोजी परतावप्रास सुरवात झाली रात्री ३५ मैलावरील फ्लोरेन्स स्टेशनला (साउथ कॅरोलाईना प्रांतातच) यावे लागले. कारण समटरचे रेल्वे स्टेशन पुऱ्या उताऱ्याच्या अभावी नुकतेच बद केले होत. येथे बसने जाणे गरिबीचे समजतात रेल्वेने मध्यम प्रतीचे व स्वतःच्या गाडीने वा टॅक्सीने किंवा विमानाने जाणे उच्च प्रतीचे समजतात. आम्ही आमच्या कारनेच निघणार होतो परतु फार लाबचे ड्रायव्हिग व पेट्रोलची (gasoline) कमतरता यामुळे हा बेत रद्द करून रेलरोडने निघावे लागले. न्यूयॉर्क, समटर पासून ७०० मैल आहे

क्लार्कने सामानास भलतेच लेबल लावल्यामुळे गडबड झाली होती. म्हणून ती लगेच सुधारून घेतली डब्याशी गेल्या बरोबर कडक्टरने आमचे हातातील

सामान घेतले व नीट वरच्या जागी लावले. आम्हांला वाटेवरील वॉशिंग्टन पहावयाचे होते ते येण्यापूर्वी सकाळी कडक्टर उठवावयास आला याने आमचे सामान नीटपणे उतरवून आमच्या ताब्यात दिले. अर्थात हा २५ सेंट (रु दोन) टिप मागावयास विसरला नाहीच

आता आम्ही अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन येथे आलो डब्यातील व्यवस्था हुबेहुब विमानाप्रमाणेच गुबगुबीत गाद्याच्या खुर्च्यांच्या सीट्स होत्या. कडक्टरने आणखी उशा आणून दिल्या नाविन्यमात्र पायखान्यामध्ये पाहावयास मिळाले. आत शिरल्याबरोबर पण प्रत्यक्ष संडासाच्या बाहेर चार मऊ मऊ खुर्च्या क्यू करून उभे राहावे लागू नये म्हणून बसण्याकरता होत्या हे एक निराळेच दृश्य दिसले

चांदोबाला (आमचा तेरा वर्षांचा नातू) आमच्या बरोबर माहितगार म्हणून घेतला होता कारण चिरजीवाना रजा मिळाली नाही याने उतरल्याबरोबर डिपार्टमेंट स्टोअरमधील गाडीप्रमाणे हातगाडी आणली. हमाल बहुश नसतातच. बाहेर पडल्याबरोबर येथील पद्धतीप्रमाणे लॉकरमध्ये हातातील सामान टाकले २५ सेंट टाकले की लॉकरला असलेली किल्ली लागू होते, दरवाजा उघडतो नाहीतर उघडत नाही लॉकर बद केल्यावर किल्ली आपल्याजवळ ठेवावयाची असते हे सर्व नातवाच्या मदतीने पटापट झाले. परतल्यावर सामान काढावयाचे म्हणजे झाले किल्ली २५ सेंट टाकल्याशिवाय निघतच नाही येथे दोन गमती जमती पाहावयास मिळाल्या दोन मिनिटात चार प्रकारचे फोटो काढून मिळतात व आपल्या नावाचा बिल्ला करून मिळतो. या दोन्ही गोष्टी आपणच स्वत करावयाच्या असतात आमचे फोटो काढून घेतले व बिल्लेही करून घेतले स्पेलिंग प्रमाणे खुणेचा बाण अक्षराच्या दिशेने फिरवला व डावे हँडल मारले की अक्षरें रुपया एवढ्या चकतीवर उठतात. नाव व पत्ता छापून संपले की उजवे हँडल दाबावयाचे म्हणजे बिल्ला बाहेर पडतो सर्व सूचना मशीनवर छापलेल्या असतात येथे गाडी येण्यापूर्वी १५ मिनीटेच अगोदर उतारुना प्लॅटफॉर्मवर घेतात परतु वेटिंगरुम मात्र उत्कृष्ठ असते टी. व्ही. वर सतत गाड्याची माहिती येत असते.

# गांवातील कंडक्टेड टूर

स्टेशनवरच 'डायमंड टूर्स साइट्सीइंग' कंपनीची तिकिटे काढली बस मध्ये ड्रायव्हर माइकने एकसारखी माहिती देत होता. प्रथम अमेरिकेची कॅपिटॉल पाहिली नंतर व्हाईट हाऊस (White House) येथे प्रेसिडेन्टचे वास्तव्य असून त्याचे ऑफिसही येथेच असते या इमारतीमध्ये एकूण १३६ खोल्या आहेत ठिकठिकाणी गाईड ठेवले आहेत वरील स्थलाशिवाय सुप्रीम कोर्ट नॅशनल आर्चीव्हज, स्मिथसोनिअन् इन्स्टिटयूशन, लिंकन मेमोरिअल व आर्लिंग्टन नॅशनल सिमेटरी या गोष्टी काही जवळून तर काही आत हिंडून पाहावयास मिळाल्या याशिवाय जाता जाता अगणित संस्था बाहेरुन दाखविण्यात आल्या कॉंग्रेसच्या बैठकी पाहताना विशेष वाटले विशेष कौतुक वाटले ते दफन भूमी पाहतांना ही जागा एकूण ११००० एकर असून नी राखून ठेवलेली आहे या दफन भूमीची दफन भूमी म्हणून स्थापना झाली ती १८६४ साली तरी पण ती खाजगी मालकीचीच होती सरकारने ती १८८३ साली डॉलर १,५०,००० देऊन विकत घेतली गेल्या दीड शतकामध्ये रेव्होल्युशनरी वॉर पासून ते थेट कोरिअन व व्हिएटनाम लढाईमध्ये मेलेल्या हजारो देशभक्ताची थडगी अत्यंत सरळ रेषेमध्ये "फॉल इन" मध्ये बांधून काढलेली आम्हास पाहावयास मिळाली दुरुन तर आम्हास वाटले की मिलिटरीची परेडच चालू आहे एवढी ती एका सुतात व एका रेषेत आहेत. येथे प्रेसिडेंट जॉन केनेडीची अखंड ज्योत पाहावयास मिळाली या ठिकाणी २४ तास मिलिटरीचा पाहारा असतो ही जागा वाढविण्याचा सरकारचा विचार चालू आहे एकंदर १० प्रकारच्या टूर पैकी आम्ही तिसरी 'CBA" टूर घेतली होती व याकरता आम्हाला माणशी डॉलर १०.५० म्हणजे रु ७८-७५ पडले टूर्सची सोय फारच उत्तम आहे त्रास बिलकुल नाही

शुद्ध, स्वच्छ आणि स्पष्ट मराठी बोलणारी पाद्री रेल्वे स्टेशनवर इंडिकेटरवर आम्ही गाडीचो वेळ व प्लॅटफॉर्म क्रमांक पाहात असताना आपापसात बोलत होतो

दरम्यान एक गोरा आमच्याजवळ येऊन मराठीत म्हणाला "आपल्याना काय पाहिजे आहे ?" विचारता कळले की हे गृहस्थ एक मिशनरी असून कोल्हापूरला १४ वर्षे काम करीत होते.

## ऐतिहासिक फिलाडेलफिया

दिनाक ११ डिसेंबर १९७३ रोजी आम्ही वाशिंग्टन, डी. सी., सोडले व सध्याकाळच्या ४–०५ च्या गाडीने फिलॅडेलफियाला आलो येथे आमचे भाचे चि वि चिं. म्हणजे भाऊसाहेब वैद्य (मुबई म्युनिसिपालिटीचे डेप्युटी कमिशनर) याचे जामात चि सुरेशभाई जोशी पुर्वी ठरल्याप्रमाणे आपली गाडी घेऊन स्टेशनवर आले होते. अमेरिका स्वतत्र झाल्यानतर स्वतत्र अमेरिकेची फिलेडेल्फिया ही पहिली राजधानी होय याच्याकडे दोन रात्री काढून पुढच्या प्रवासाला उजाडत्या दिनाक १३ रोजी निघालो आता आमचे-ज्येष्ठ चिरजीव भाऊसाहेब आम्हाला निरोप देण्यासाठी येथे येऊन आम्हाला मिळाले होते

## युनायटेड नेशनला भेट

सकाळच्या गाडीने न्यूयार्कला येऊन पोहोचलो येथे जिने होते. ते सर्व एस्केलेटर. यामुळे आम्हा उभयतांची फजितीच झाली म्हणावयाची ! कारण मी एकदाच का होईना कलकत्ता रिझर्व्ह बँकेमध्ये असला जिना वापरला तरी होता परतु आमच्या मडळीचे काय ? त्या (व मी सुद्धा) जिन्याशी जाऊन एकदा साप पाहून सावरावे किंवा भुताचा भास होऊन थबकावे त्याप्रमाणे त्या फिरत्या जिन्याजवळ जाऊन मागे फिरत होतो असे पाहून अखेरीस आमचा नातु चादोबा याने सौ सरस्वतीबाईना व एका अमेरिकनाने मला धरून वर नेले काही वेळाने खाली येणे प्राप्त होते आला का पुन्हा तसलाच प्रसग ! पण केली हिंमत आणि आलो कसे तरी खाली.

येथून तडक युनोकडे भाऊसाहेब आम्हाला घेऊन गेले गाईडने निरनिराळे विभाग दाखवले व काही बैठका व सभा आम्ही पाहिल्या इमारतीच्या

बाहेर आल्यावर भाऊसाहेबांना आपल्या तिरंगी झेंड्याखाली आमचे फोटो काढावयाचे होते परंतु आपल्या झेंड्यासारखे किंचित फरक असलेले दुसऱ्या ४–५ राष्ट्रांचे झेंडे येथे असल्यामुळे थोडा वेळ शोधून काढण्यासाठी लागला व अखेरीस आपल्या झेंड्याखाली आमचे अनेक फोटो काढण्यात आले थंडी फार तिचा त्रास झाला पण यू नो च्या दुर्मिळ भेटीने आनंद होत होता

येथून आम्ही जगप्रसिद्ध केनेडी एअर पोर्टवर आलो येथे पुन्हा आपला मागीलप्रमाणे एस्केलेटर आमच्या समोर उभा परंतु आता धीर चेपला होता, व आम्ही काम नसताही अगदी उगीचच एस्केलेटरने वर–खाली ये–जा करीत होतो कारण या गोष्टीची आम्हाला आता भीति ऐवजी गमत वाटू लागली होती विमे उतरविल्यावर एकमेकाचे निरोप दिले व घेतले आणि आम्ही कस्टम्समध्ये शिरलो आणि आमचा व भाऊ आणि चांदोबा यांचा प्रत्यक्ष असलेला सबध तुटला आणि जाताना कनिष्ठ चिरजीव पोर्टवर आले होते तर येताना ज्येष्ठ चिरजीव आले होते

जाताना दोन्ही विमाने (येथून पॅरिसपर्यंतचे व तेथून पुढेच) किंचीत ल्हान होती. तरी सुमारे १५० उतारू होते परत येताना दोन्ही जंबो होती. विमानात एखाद्या सभेचेच दृश्य दिसत होते बाकी सर्व व्यवस्था मागील प्रमाणेच होती जरी सर्व्हिस फ्रेंच असल्यामुळे भा षे ची अ ड च ण थोडीशी भासली तरी पण खाणे पिणे, सिनेमा दाखविणे वगैरे सर्व काही व्यवस्थित होते. सिनेमा दिसेना म्हणून मी ४ उशा बसण्यासाठी मागितल्या तर हवाई सुदरीने ८ उशा व पांघरुणही आणून दिले हवाई सुंदऱ्या नावा-प्रमाणे खरच सुंदर नीटनेटक्या व चटपट, असतात

समोरच्या पॉकेटमध्ये प्रत्येकाकरता एअर फ्रॉन्सच्या अॅटलासचा डिसेबरचा ताजा अक, टारिफ प्राईस लिस्ट, प्रोग्राम म्युझिकल एअर माहिती पत्रक व मेनूकार्ड होते यात थोडीबहुत हवी असलेली माहिती मिळू शकते सांताक्रुझ-जवळ आले की डिसएम्बारकेशन कार्ड भरून द्यावे लागले हे जातानाही भरून द्यावे लागले होते

आमचे विमान पॅरिसलाही वेळेवर आले व पॅरीसला बदलून दुसरे घेतलेलेही मुंबईस वेळेवर आले दुसऱ्या विमानात पॅरिसला विमान बदलले तेव्हां आम्हाला दूरदूर बसावे लागले असते पण मला रुद्रावतार धारण करावा लागला व मग काम झाले "मला वरच्या ऑफिसरला भेटवा" म्हटल्यावर हवाई सुंदरीने सर्व काही ठाकठीक केले. कस्टममध्ये फारसा त्रास झाला नाही विमान पहाटे ३–५५ वा यावयाचे होते त्याप्रमाणे ते वेळेवर आले रात्र असल्यामुळे विमान उतरताना खाली दिव्याची मौजच मौज दिसत होती कारण ट्रॅक दाखविण्यासाठी निळे, पांढरे वगैरे निरनिराळ्या रंगाचे दिवे रांगेत उभे राहून विमानाला मार्गदर्शन करीत होते याची मौज वाटली.

जाताना ठाणे ते सांताक्रुझ मोटार भाडे रु ५० द्यावे लागले होते येताना चारच महिन्यात झालेल्या भाववाढीमुळे ते रु ११० द्यावे लागले.

अशा प्रकारे आम्ही उभयता १२० व्या दिवशी सुखरुप येऊन पोहोचलो परमेश्वराची कृपा ! मनात जाता–येता विशेषत विमानात एक सारखी धाकधुक वाटत होती "काही बरे वाईट झाले तर ?" परंतु सर्व शक्तिमान जगन्नियत्या परमेश्वराला सर्वांची काळजी असते सातासमुद्रापलीकडील आमचे दोन्ही चिरंजीव, सुना, नातु व घर आणि वेगळ्या चालिरिती पहावयास मिळून भारतास परत आलो म्हणून अभिमान वाटला हिंदुस्थान आज स्वतंत्र नसता तर हे शक्य होते का !

* * *

# १५

## राहून गेलेले पण महत्वाचे विषय

### *शिक्षण, युनो, बादशाहा निक्सन शिक्षण पद्धती*

वहुतेक सर्व संस्थानामध्ये शैक्षणिक संस्था आहेत सर्व प्रकाराच्या शिक्षणावर यांची हुकमत चालते ह्या संस्थेमधील सदस्य उत्तम नागरिकत्व जाणणारे असून हे गव्हर्नरने निवडलेले असतात. व्यवस्था व कारभाराच्या बाबतीत प्रत्येक संस्थानाचे शैक्षणिक जिल्हे पाडलेले असतात असे जिल्हे देशात सुमारे २८,००० आहेत

असल्या एका जिल्ह्यावर सुपरिन्टेंन्डेन्ट, २ असिस्टन्ट, सुपरि असिस्टन्ट आणि एक डायरेक्टर असतो व हा शिक्षकाच्या नेमणुका वगैरे करतो हे कारभार हाकलणारे झाले याशिवाय २ हायस्कुले ३ ज्युनिअर हायस्कुले ११ प्राथमिक शाळा यावर प्रिन्सिपॉल व असिस्टन्ट प्रिन्सिपॉल असतात.

शिक्षण किंडरगार्टनमध्ये चवथ्या वर्षी सुरु होते.

## शिक्षकांचे वेतन

शिक्षकाच्या पगाराची सरासरी सालिना डॉलर ९,२६५ (सुमारे रु ६४,८५५) पडावयास जाते. पाच हजार डॉलर्सच्या खाली (सुमारे रु ४०,०००) मात्र कोणत्याही शिक्षकाला पगार नसतो हा जास्तीत जास्त १५००० पावेतो असतो सर्वांत वरच्या पातळीवरचा जिल्हाधिकारी सुपरिन्टेंन्डन्ट सुमारे डॉलर ३०,००० मिळवितो. सरासरीने स्थानिक कमिटया ५५% संस्थान व परगणा सरकार ४०% आणि मध्य सरकार उरलेला खर्च सोसते एका विद्यार्थ्यामागे वर्षाला सुमारे डॉलर ५०० खर्च पडतो.

आताशा शैक्षणिक पद्धत बदलली आहे विद्यार्थी हा मध्यबिंदु झाला आहे अध्यापक हा तज्ञ म्हणून राहिलेला नाही तो संवादी व्यवस्था निर्माण करतो म्हणजे त्याला प्रश्नोत्तररुपी शिकवावे लागते विद्यार्थीही पुष्कळच रस घेऊ लागले आहेत टेप रेकॉर्डर, फिल्म, प्रॉजेक्टर वगैरे प्रकारच्या दृश्य स्वरुपातील निरनिराळया पद्धतीचा उपयोग होऊ लागला आहे. व्याख्यानबाजी कमी कमी होत चालली आहे.

## ज्ञानाची साधने

साधारणपणे शाळांना वातावरण गरम व थंड करण्याच्या सोई दिलेल्या असतात प्रत्येक शाळेला स्वतंत्र ग्रंथालय असते. विद्यार्थ्यांना मोकळेपणाने ग्रंथालयात जाता येते प्रत्येक शाळेची खेळण्याकरता मैदान व याकरता साधनसामुग्री असते. त्याचप्रमाणे प्रत्येक वर्गाकरता अल्बम्, रेकॉर्डस् व रेकॉर्ड प्लेअर असते. नजरेनी बघण्यासारख्या वस्तू संग्रह करून ठेवलेल्या असतात. ह्या अध्यापकाला आपल्या वर्गासाठी नेता येतात व काम झाल्यावर परत करता येतात

प्रत्येक शाळेला जोडून उपहारगृह असते. आहार तज्ञाच्या देखरेखीखाली अन्न तयार केले जाते. सरकारची या गोष्टीला मदत असते मुलांना फक्त ३५ सेन्टस् जेवण्याचे द्यावे लागतात

प्रत्येक शाळेच्या जिल्ह्याला एक व्यायाम तज्ज्ञ डायरेक्टर असतो आणि प्रत्येक शाळेला एक शिक्षक असतो हायस्कूलचा प्रत्येक खेळाचा संघ असतो

पण शिस्तीचा प्रश्न मात्र आता सुरु झाला आहे मादक पदार्थांचे सेवन वाढू लागले आहे

आत्ता आत्ता पावेतो शाळेमध्ये जातीविषयक पृथकपणा दृश्य स्वरुपात होता परंतु १९५४ च्या सुप्रीम कोर्टाच्या निवाड्यापासून एकतेकरता फरक होऊ लागला आहे खऱ्याखुऱ्या बदलाला १९६८ साली सुरवात झाली ह्याला एकतर मध्य सरकारच्या प्रचंड देणग्या व कोर्टाचे हुकुम होत

खाजगी शाळाही आहेत ह्यांनाही सरकार थोडी बहुत ग्रँट देते ह्या फी फार आकारतात पण देणग्या सहसा घेत नाहीत प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थी साधारणपणे वार्षिक डॉलर ५०० देतात

## युनो (United Nations Organisation)

"संयुक्त राष्ट्रे" (UN) ही संस्था २४ ऑक्टोबर १९४५ रोजी अस्तित्वात आली हा दिवस संयुक्त राष्ट्र दिन म्हणून पाळण्यात येतो. याच दिवशी युनोच्या सनदेला कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले ही सनद सॅन फ्रॉन्सिस्कोमध्ये दुसऱ्या जागतिक युद्धाच्या शेवटी तयार करण्यात आली तिची प्रस्तावना अशी –

संयुक्त राष्ट्राची आम्ही जनता युद्धाच्या शोकांतिकेच्या घटनेपासून भावी पिढीला रक्षण करण्याचा दृढ निश्चय करीत आहोत आणि म्हणून सर्व संबंधित सरकारे युनो, नावाची आंतरदेशीय संस्था स्थापन करीत आहोत

सदरहू सनदेमध्ये ह्या संस्थेची कारणें व मुलतत्वे खालील प्रमाणे होय

१] अंतरदेशीय शांतता आणि सुरक्षितता यांचा सांभाळ करणे.

२] राष्ट्रांराष्ट्रांमध्ये मैत्रीचे संबंध वृद्धींगत करणे

३] आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवी अडचणी सोडविण्यासाठी सहकार्य सपादन व मानवी हक्क आणि प्राथमिक व अवश्यक स्वातंत्र्य या बाबतीतील आदर वाढविणे

४] ह्या सर्व साधारण अंतिम गोष्टी मिळविण्यासाठी राष्ट्राच्या धोरणामध्ये सुसवाद आणण्याकरिता केंद्र बिंदु बनणे

युनो हे काही जागतिक सरकार नव्हे. सदस्य राष्ट्रे सार्वभौम आहेत. आणि समपातळीवरील समसमान आहेत

सुरवातीला ५१ राष्ट्रे सभासद होती ती १९७१ पावेतो १३२ वर चढली. युनोच्या अधिकृत भाषा चिनी, इंग्लिश, फ्रेंच, रशियन व स्पॅनिश आहेत प्रतिनिधी त्याचप्रमाणें व्हिजिटर ह्व्या असलेल्या भाषेची तबकडी फिरतात (dial) आणि वक्त्याचा आवाज किंवा इअरफोन (earphone) मधून एक समयावच्छेदे करून अर्थ ऐकत बसू शकतात

सर्वसाधारण सभा (The General Assembly), सुरक्षितता मंडळ (The Security Council), आर्थिक व सामाजिक मंडळ (The Economic and Social Council), सचिवालय (The Secretariat) आणि आंतर-राष्ट्रीय न्यायालय (The International Court of Justice) अशी युनोची ६ प्रमुख खाती होत

युनोची मुख्य कचेरी न्यूयॉर्कला आहे. १९४६ साली लंडनला भरलेल्या पहिल्याच बैठकीत ही जागा मुक्रर झाली १९५२ साली युनोची इमारत बांधण्यात आली या कचेरीची एकूण जागा १५ एकर आहे.

वार्षिक सभा सप्टेंबरच्या तिसऱ्या मंगळवारी सुरु होते व डिसेंबरच्या मध्या-पर्यंत चालते.

युनोच्या सभाना कोणालाही हजर राहता येते तिकिटे विनामुल्य मिळतात. त्याचप्रमाणे तासाभराच्या फिल्मा दररोज विनामुल्य पाहता येतात.

## एका बादशहाचा बादशाही जीवनातील स्वैर अपव्यय

अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांच्या 'की बिस्केन' (फ्लोरिडा) व 'सॅन् क्लेमेन्ट' (कॅलिफोर्निया) येथील स्वत च्या वास्तूचे राजेशाही नूतनीकरण करण्याकरिता जनतेच्या पैशाचा भरमसाठ अपव्यय केल्या कारणाने पुष्कळच लिहिले गेले आहे परंतु त्याच्या कॅंप डेव्हिड येथील अध्यक्षीय वसतिस्थानावर केलेल्या वारेमाफ खर्चाविषयी अद्याप तरी फारच थोडे लिहिले गेले आहे

वॉशिंग्टन पोस्टच्या गेल्या आठवड्यातील अकातील माहिती प्रमाणे प्रे निक्सन याच्या पांच वर्षांच्या कारकिर्दीमध्ये डॉलर २५,००,००० (म्हणजे पावणे दोन 'कॅम्प् डेव्हिड्' वर कोटी रुपये) अदमासे खर्च केले आहेत हा खर्च ह्याच्या मागील तिघाच्या एकत्र केलेल्या खर्चापेक्षाही जास्त आहे

पैकी डॉलर १,५०,००० (अदमासे रु ११,२५,०००) एवढी मोठी रक्कम आपल्या बगल्याच्या दाराजवळ त्यांना हव्या असलेल्या पोहोण्याच्या तलावा-करता खच पडली आहे पूर्वी असा एक खास तलाव होताच परंतु तो पाव मैल अतरावर होता आणि यामुळे तो गैरसोईचा होता. माजी अध्यक्ष आयसेन हॉवर, केनेडी व जॉन्सन यांना मात्र तो त्रासदायक नव्हता.

ह्या तलावाशिवाय त्यांच्या सभोवताली आणखी एक स्नानगृह बांधण्याकरता डॉलर १,००,००० (अदमासे रु ७,५०,०००) त्यांनी खर्च केले

कॅम्प् डेव्हिडच्या सभोवार दोन नव्या पर्णकुटचा व अद्यावत अध्यक्षीय वास्तु यांचा समावेश आहे

ही सर्व नुतनीकरणे व वाढ यामुळे निक्सनने १९६९ साली अधिकारपद घेतल्यापासून डॉलर २३,८३,९७७ नी (सुमारे रु पावणे दोन कोटी) खर्चात वाढ केली आहे.

["समटर डेली आयटेम"च्या दि. ३१ ऑक्टोबर १९७३ च्या अग्रलेखाचा अनुवाद ]

* * *

# १६

## उपसंहार

सहज संधि साधेल त्यांनी ती न दवडता तिचा पुरेपुर फायदा घेऊन जरूर जरूर अमेरिकेला जावे व "बरे म्हणुनि घेई, बरे म्हणुनि घेई" या काव्योक्तिप्रमाणें जे जे बरे दिसेल ते ते आपल्याकडे आणावेही

उदाहरणार्थ उभय व्यक्ति व समष्टिबाबत स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, चापल्य, टाकठीकपणा, शिस्त, निरलसपणा, दुकानदारी पद्धती, शिक्षणाची उत्कट आवड व तीसाठी धडपड, राजकीय यत्रणा वगैरे गोष्टींचा सखोल अभ्यास करून या गोष्टी येथे आणाव्या

परतु तेथील सामाजिक रुढी, बाहेरुन कीर्तन पण आतून तमाशा तशा बाहेरून स्वर्गीय दिसणाऱ्या परी पण आतुन बजबजपुरी अशा सारख्या आदिभौतिकतेला दिपून जाऊन झगझगाटाला झुकेल व चमचमटाला चमकेल असे होऊ न देता आपला तोल सांभाळून आपले वैशिष्टय अध्यात्मिकता या गोष्टीला धरुन राहण्याकरता विनाकारण गरजांचा वाढविलेला विस्तार वगैरे गोष्टी मात्र आणू नयेत कारण जो जो गरजा कमी तो तो सुख जास्त

(THE FFWER THENECESSITIES THE HAPPIER AMAN) या युक्तीप्रमाणे वागण्याचा जो प्रयत्न करतो तोच स्थित प्रज्ञतेची वाटचाल करतो म्हणून त्याला स्थितप्रज्ञ होण्यास मुळीच काल लागणार नाही अशा जीवालाच चिरसौख्य (Eternal happiness) प्राप्त होते व तोच जीवन्मुक्त होतो ही गोष्ट विसरून चालणार नाही हेच मानववाचे उद्दिष्ठ असावे व त्यांनी पुढे पुढे जात राहावे

पडले पार अता हे प्रारभीप्रार्थिल्यासवे नीट ।
नसता इच्छा तुमची घडले नसते करुनि खटपट ।।

इति –

आणि म्हणून तुमच्या मार्गदर्शनासाठी पुढील २ परिशिष्ठें जोडली आहेत.

# परिशिष्ट १

## अमेरिकच्या संयुक्त संस्थांना विषयी ठोकळपणे थोडक्यात सर्व कांही

### नैसर्गिक

हे राष्ट्र ठोकळमानाने ६५–१२५ अक्षाश व २५–५० रेखांश याच्यामध्ये समावलेले आहे सीमा रेषांचे अतर पूर्व–पश्चिम सुमारे २५०० मैल असून दक्षिणोत्तर सुमारे १००० मैल आहे क्षेत्रफळ ३०,००,००० चौ मैल आहे ह्या देशाच्या चतु सीमा पुर्वेस अटलाटीक महासागर, पश्चिमेस पॅसिफिक महासागर, उत्तरेस कॅनडा व दक्षिणेस मेक्सिको आणि मेक्सिकोचे आखात अशा आहेत भूप्रदेशाचे विभाग पूर्वेस ॲपेलेशियन पर्वत, मध्यें अफाट मैदान व पश्चिमेस रॉकी पर्वत असे होत. येथे पाऊस २०" ते ६०" पडतो ३०% जागा जगलांनी व्यापली आहे

ह्या देशाचा विस्तार वाढता वाढता अखेरचा अलास्का धरुन आता ५० सस्थानापर्यंत वाढला आहे ती सस्थाने अशी :– १) अल्बामा, २) अलास्का,

३) आरकॅन्सस, ४) कॅलिफोर्निया, ५) कोलोरॅडो, ६) कॉनेक्टीकन्ट, ७) डेलावेअर, ८) कोलंबिया, ९) फ्लोरिडा, १०) शिऑर्मिआ, ११) अवाई १२) इडॅव्हो, १३) इलिनॉइस, १४) इंडियाना, १५) आयओवा, १६) कॅन्सस, १७) केन्टकी, १८) लुइसिआना, १९) माइन, २०) मेरीलॅंड २१) मॅसॅच्युसेटस्, २२) मिशिगन, २३) मिनेसोटा, २४) मिसिसिपी, २५) मिसौरी २६) मॉन्टाना, २७) नेब्रॅस्का, २८) नेवदा, २९) न्यूहॅम्फायर, ३०) न्यूजर्सी, ३१) न्यूमेक्सिको, ३२) न्यूयॉर्क, ३३) नॉर्थकॅरोल्लायना, ३४) नॉर्थडॅकोटा, ३५) ओहिओ, ३६) ओक्लाहोमा, ३७) ऑरेगॉव ३८) पेनसिल्व्हानिआ, ३९) रोड आयलंड, ४०) साऊथकॅरोलायना, ४१) साऊथ डॅकोटा, ४२) टेनेसी, ४३) टेक्सस, ४४) उटा, ४५) व्हर्मान्ट, ४६) व्हर्जिनीआ, ४७) वॉशिंग्टन, ४८) वेस्टव्हर्जिनिआ, ४९) व्हिस्कॉन्सिन, ५०) व्योमिंग लोकसंख्या १९४० साली १३,००,००,००० होती

## जनतेचा व्यवसाय

गेल्या शतकामध्ये ८०% लोक शेतीवर अवलंबून होते आता फक्त २०% आहेत येथे महत्वाची पिके तांदूळ, गहू, मका, बार्ली ओट, सोयाबिन, कापूस, ऊस, तंबाकू व फळफळावळेही होत दगडी कोळसा, तेल, लोखंड, शिसे, जस्त, तांबे, ॲल्युमीनियम, सोने व चांदी अशी खनिज संपत्ती आहे याशिवाय पशुधन भरपूर असून मासेमारीचा धंदा उत्कृष्ट चालतो

## उद्योग धंदे

रेल्वे एंजिन, मोटारगाड्याः जहाजे, हरप्रकारची कापडे वगैरे प्रकारचे उद्योग धंदे महत्वाचे होत लोहमार्ग २,४३,००० मैल लांबीचा आहे हा सर्व जगाच्या $\frac{1}{3}$ होय तर सडक मार्ग ३०,००,००० मैल आहे जगाच्या ७०% मोटारी येथे आहेत जलमार्ग २०,००० मैलाचा आहेत. येथे दर माणशी एक असे मोटारीचे प्रमाण पडते

## व्यापार

आयात ५७३ कोटी व निर्यात १५३३ कोटीची आहे महत्वाची शहरे वॉशिंग्टन हे राजधानीचे शहर आहे येथे व्हाइट हौसमध्ये प्रेसिडेंट राहतो हे १८ एकर जमिनीवर उभे आहे येथे एकूण ३२ खोल्या आहेत न्यूयॉर्क हे लोकसख्येने अमेरिकेत पहिल्या व जगात दुसऱ्या प्रतीचे शहर होय याची लोकसख्या ८०,००,००० आहे हे सर्वात महत्वाचे बदर व अत्यत श्रीमत शहर आहे येथे गगनचुबी इमारती पुष्कळच आहेत. याच्या खालोखाल बोस्टन, सॅन्फ्रॉन्सिको, फिलॅडेल्फीया, शिकॅगो ही महत्वाची शहरे होत आमचे समटर व बून ही लहान लहान शहरे होत

## धर्म

ख्रिचियॅनिटी हाच येथे मुख्य धर्म होय याशिवाय ख्रिचिॲनिटीचे उपधर्म प्रॉटेस्टट, प्रेस्बिटेरियन वगैरेचे अनुयायीही पुष्कळच आहेत "हरेराम हरेकृष्ण हा एक नवीनच पथ निर्माण झालेला असून ह्यानी चागलेच मूळ धरले आहे उत्तर अमेरिकेत ख्रिश्चन २२,४८,८०,०००, मुसलमान १,६८,०००, तर हिंदु फक्त ५५,००० आहेत

## राजकीय

ब्रिटिशापासून फटकून स्वातत्र्याचा जाहीरनामा दिनांक ४ जुलई १७७६ मध्ये फिलॅडेल्फिया मुक्कामी स्वीकृत झाला यावेळी जॉन हॅंकॉक हा राष्ट्राध्यक्ष होता ताडपत्रावर लिहिलेल्या एका नकलेवर कॉंग्रेसच्या सर्व सभासदानी २ आगष्ट १७७६ रोजी सह्या केल्या दिनाक १८ जान्युअरी १७७७ रोजी कॉंग्रेसने हुकूम सोडला की ह्याच्या नकला सर्व सस्थानामध्ये पाठविण्यात याव्यात ह्या नतर बाल्टिमोरच्या कॉंग्रेस अधिवेशनात ह्या वाटण्यात आल्या

यानतर ७ कलमी घटना तयार करण्यात आली.

मागे म्हटल्याप्रमाणे ५० सस्थानाचे हे सयुक्त रिपब्लिक तयार करून झाले आहे

तसे पाहिले तर प्रत्येक संस्थान हे स्वतंत्र आहे

मध्य सरकार हे सेनेट व हौस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हिज यानी बनले आहे

प्रत्येक संस्थानाला सेनेटवर प्रतिनिधत्व सारखे आहे. दोन दोन प्रतिनिधी प्रत्येक संस्थान निवडते. अशाप्रकारे १०० प्रतिनिधींचे सेनेट तयार होते. हौस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज मात्र ४३५ चे असते प्रतिनिधी, लोकसख्येच्या प्रमाणात निवडले जातात राष्ट्राध्यक्ष (President) हा सरळ मतदाराकडून निवडला जातो याची मुदत ४ वर्षांची असते हा कार्यकारी सत्ताधीश असतो. उपाध्यक्षाला ह्या सर्व गोष्टी लागू असतात न्यायविषयक अधिकार हे एकमेव सुप्रीम कोर्टाकडे असतात गुन्ह्याची चौकशी पच मडळीकडून होत असते. प्रत्येक संस्थानाचा गव्हर्नर हा त्या त्या सस्थानाचा सत्ताधारी असून ह्याची निवडणूक होत असते. ह्याला साह्यकारी सेनेट व हौस असते प्रत्येक सस्थान परगणा किंवा पेटा यांनी विभागलेले असते. त्याचप्रमाणे प्रत्येक शहराचा प्रमुख मेयर असतो.

## सामाजिक

तेथील समाजामध्ये वागण्याचे जणू काही सकेतच ठरून गेल्यासारखे आहेत कोठेही भेट झाल्यावर स्मित हास्य करून हाय् म्हणणे, फार न बोलणे, गुडघ्याला गुडघा चिकटवून बसणे, जेवतांना तोंडाने आवाज न करणे, तरुण आहोत असे दिसण्याचा प्रयत्न करणे वृद्धा नारीसुद्धा झपाझप चालेल किंबहुना धावतही सुटेल

लष्करी शिक्षण सक्तीचे आहे वैवाहिक जीवन विचित्र आहे केव्हां काडीमोड घेतली जाईल व केव्हा परत काडीजोड होईल ते सांगता येत नाही. २५ किंवा ५० जोडपे सुखाने नांदले तर ज्युबिल्या साजऱ्या करतात.

वृद्धाचे मात्र हाल कुत्रा खात नाही वेगळे राहत असल्यामुळे भेटीगाठी क्वचित होतात. वृद्धांच्या आजारीपणात मायेचा शब्द नाही. पधरा दिवस तीन वाराना मुलगा, मुलगी, सुन, जावई, भेटावयास आलेच तर खाण्याचे

पदार्थ आणून टाकतात की झाले प्रेम दर्शन लहानशा मुलाने लहानसे काम केले तरी त्याला काही तरी मोबदला देण्याची प्रथा आहे

आपल्याकडल्या प्रमाणे एखाद्या सस्थेमध्ये विनावेतन (Honorary) काम करणे हे कसे काय हे त्याना कळतच नाही सगळे जीवन पैशासाठी, पैसा हाच देव एखादी तरुणी हीच देवता आणि पैसा चैनीसाठी

* * *

# परिशिष्ट २

## *प्रस्थानपूर्व सिद्धता*

परदेशात जावयाचे म्हणजे निमत्रण, सर्व प्रथम तेथील एखाद्या शिक्षण देणाऱ्या सस्थेचे शिक्षक वा विद्यार्थी म्हणून उद्योगधदा करणाऱ्या कपनीचे नोकरी-साठी अथवा नातेवाईकाचे भेटीकरता निमत्रण यावे लागते नुसते उठले की चालू लागता येत नाही हल्ली एखादा देश पाहण्यासाठीही ठराविक मुदती-पर्यंत जाता येते

वरीलपैकी आमचे नातेवाईक ज्येष्ठ चिरजीव प्रभाकर भाऊसाहेब व ज्येष्ठ स्नुषा सौ सविता यांचे निमत्रण दि १३–२–७३ रोजी आले हे देण्यापूर्वी निमत्रिताना पोसण्याची ऐपत आम्हाला आहे हे सिद्ध करण्याकरिता प्रथम बँक बॅलन्स भरपूर आहे असे बँकेचे सर्टिफिकेट घ्यावे लागते यानतर एक पत्र तयार करून ह्यामध्ये स्वच्छ म्हणावे लागते की निमत्रिताना लागणाऱ्या सर्व खर्चाची जबाबदारी घेत आहोत अशा दोन गोष्टी तपासून पाहिल्यावरच नोटरी पब्लिक सदरहू निमत्रण पत्रावर सही करतो याला जाहीरनामा (Declaration) म्हणतात हे डेक्लेरेशन फार महत्वाचे आहे हे येथे मध्यसरकारला म्हणजेच पासपोर्ट कचेरी मध्ये (Public Relations officer, Regional Passport Emigration office Bombay) दाखवावे लागते यांच्या आधारावरच पासपोर्ट कचेरी परवानगी वजा पासपोर्ट म्हणजे प्रवासाचे ओळखपत्र देते याकरता आणखीही गोष्टींची जरुरी असते, त्या पुढे पाहू.

वरीलप्रमाणे रीतसर बोलावणे आले की पहिली गोष्ट म्हणजे कलेक्टर कचेरी मधून "पासपोर्टकरता अर्ज (Application for passport) आणून तो भरावयाचा असतो ह्याच्या दोन प्रती पासपोर्ट कचेरीत द्याव्या लागतात. यानतर पोलीस खाते तपास करून 'हरकत नाही' म्हणून मजूरी देतात पण या गोष्टीला फार वेळ लागतो करिता कलेक्टर, मुबई कॉर्पोरेशनचा कमिशनर पगारी मॅजिस्ट्रेट, किंवा डी. एस् पी किंवा सचिवालयातील एखाद्या डेप्युटी सेक्रेटरीची सही मिळविल्यास चालते. वरील अर्जाबरोबर स्वत चा पासपोर्ट साइज फोटो काढून याच्या ४ प्रती व काही कारणाने जाणारास परत आणावे लागले तर खर्चाची जबाबदारी घेणारा जामिनदार (guarantor) द्यावा लागतो याशिवाय 'पी' फॉर्म व इन्कम टॅक्स क्लिअरेन्स सर्टिफिकेटही लागते पण ह्या दोन्ही आम्हाला लागली नाहीत कारण आम्ही व्हिजिटर होतो ऐवढे झाल्यावर पासपोर्ट ऑफीस, पासपोर्ट देते नतर ज्या देशात जावयाचे त्या देशाचा अधिकृत परवाना (Visa) त्या देशाच्या वकिलाती (Embassy) मधून मिळतो हा व्हिसा मिळाला की काम झाले हे सर्व काम, असले काम करणाऱ्या कपन्याही करतात त्यांच्यावर सोपवले की आपला वेळ, त्रास व खर्च वाचतो आम्ही एशियाटिक ट्रॅव्हल्स मुबई यांचेकडे हे काम सोपवले होते त्यानी ते उत्तम प्रकारे बजावले माझा पासपोर्ट क्रमाक दिनांक ९-८-७२ चा जे ६३८६१६ व सौभाग्यवतीचा दि. ९-८-७२ जे ६३८५५४ असे आहेत पुर्वी पासपोर्टचा आकार रु १५ पडे. आता रु ४० द्यावे लागतात पूर्वी पासपोर्ट ३ वर्षाचा मिळे आता तो ५ वर्षा-करता मिळतो व्हिसा मात्र दि १३-८-७२ रोजी मिळाला हा ६ महिने चालतो याकरता प्रत्येकी रु १६ द्यावे लागले पासपोर्ट कोठेही फिरताना जवळ बाळगावा लागतो व्हिजिटर्सना तिन्ही मेडीकल्स नसतात याचे अगोदर देवी व कॉलरा टोचून घेतल्याचे सर्टिफिकेट द्यावे लागते. ते म्युनि-सिपॉलिटी कडून मिळते काही देशांना जावयाचे असल्यास यलो फिव्हरही टोचून घ्यावा लागतो. ही गोष्ट "जागतिक आरोग्य सस्था याच्या नियमा-प्रमाणे करावी लागते व्हॅक्सिनेशनस व प्रवासाला निघण्याचा दिवस यामध्ये ८ दिवस जावे लागतात

तिकिट वर्षापुरते असते न गेल्यास सर्व पैसे परत मिळतात विमानाचे वेळी पत्रक मागून घेणे इष्ट असते ते सहज मिळते सामान माणशी २० किलोच्या-वर घेता येत नाही जादा भरल्यास ते काढून टाकतात किंवा भरमसाट दराने पैसे भरावे लागतात लहान मुलालाही २० किलोची परवानगी असते

पासपोर्ट – व्हिसा झाल्यावर चांगला मुहूर्त पाहून आगबोट अथवा विमान यांच्या तिकिटाची व्यवस्था करून घ्यावी लागते. याचवेळी सीट, खिडकीपाशी मिळावी व आम्ही शाकाहारी आहोत यांची नोंद करवून घेतली

आता राहिली प्रत्यक्ष खाजगी तयारी याकरता प्रत्येकाने आपल्या आवडी-प्रमाणे कपडालत्ता, पुस्तके, भेटी घ्याव्यात आपल्याबरोबर खाण्याचे पदार्थ नेता येत नाहीत अशी आजपर्यंत माझी समजूत होती परंतु नंतर असे कळले तसे काही नाही वाटेल ते – खाण्याच्या जिनसा सुद्धा घेता येतात. फक्त सरकारच्या म्हणजे कस्टमच्या कायद्या विरुद्ध काहीही नेता किंवा आणता येत नाही उदा. सोने–चांदी, कापड–चोपड, चैनीच्या वस्तू वगैरे. कारण याच्यावर सरकारच्या उत्पन्नाकरता कर (duty) असते. ते बुडता कामा नये हा उद्देश

निघण्यापूर्वी पुष्कळ आप्तेष्ट मंडळी भेटून गेली. डॉ शि. म. जोशी यांनी खर्चासाठी अल्पशी देणगी रु ५ आनंद संगीत विद्यालयाचे वैद्य यांनी भोजन व चि. म. द दामले यांनी दोन्ही दिले श्री. गजूकाका वैद्य वकील यांनी चहास बोलावले होते समर्थ को–ऑपरेटिव्ह कंझ्यूमर्स सेंट्रल स्टोअर्स यांनी तर पन्नास पाऊणशे रुपयाचा टी–सेट भेट म्हणून दिला त्यामुळे सोसायटीचे स्मरण मला अखंड राहील या सर्वांचे आभार मानणे हे मी, माझे कर्तव्य समजतो.

20.6.92
प्रवास
50154

RFFBK-0020711